गुलाबजामुन, पेढे (फिके कंदी), बासुंदी, जिलेबी, मलाई बर्फी, बुंदी लाडू, समोसा, ढोकळा, कचोरी
महाराष्ट्रसह जिल्ह्यातील प्रसिद्ध मिठाई श्रेणीतील एक अग्रगण्य नाव
१०३ वर्षे
बन्सी महाराज मिठाईवाले
रामचंद्र खुंट, अहिल्यानगर.
Mo. 9860566509

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

केडगाव, अहिल्यानगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
SHIVAM PROPERTIES
शिवम प्रॉपर्टीज
संपर्क - 9822116347, 9881620700

Volume - 75 | Issue- 28 | Marathi Daily | Thursday 17/9/2026 | Pages - 6 | Price- Rs. 3

उत्सव मजुरीचा, डबल फायद्याचा..
{₹999/-* दागिन्यांच्या प्रतीग्रॅम मजुरीवर}
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना तेवढी टक्के मजुरीत सूट
ऑफर 14 सप्टेंबर 2026 ते 8 ऑक्टोबर 2026 पर्यंतच वैध
उदा.
दागिन्यांचे वजन 1 ग्रॅम ते 10 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 10% लागणारी प्रतीग्रॅम मजुरी 899/-*
दागिन्यांचे वजन 50 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 50% लागणारी प्रतीग्रॅम मजुरी 499/-*
दागिन्यांचे वजन 100 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 100% मजुरीच नाही*
Conditions Apply*
योजनेचे नियम : 1) सोन्याचा प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू. 2) एका वेळेस एकाच योजनेचा लाभ घेता येईल.
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



साहेब, कालचा मोर्चा 'डीजेच्या ध्वनी प्रदूषणामुळे कानांना त्रास होईल म्हणून' विरोधासाठी होता... आणि आजचा मोर्चा 'मंडपातील लेझर दिव्यांच्या धोकादायक किरणांमुळे डोळ्यांना इजा होईल' या विरोधात आहे.

### ऑगस्ट पाठोपाठ सप्टेंबरही कोरडा; ५ लाख हेक्टरवरील पिके धोक्यात

# जिल्ह्यात पावसाची २३ टक्के तूट, दुष्काळ जाहीर होणार का?

**समाचार/नगर-दि.१७**

पावसाने अहिल्या नगर जिल्ह्याकडे पूर्णपणे पाठ फिरवल्याने संपूर्ण जिल्ह्यावर पुन्हा एकदा दुष्काळाचे सावट गडद झाले आहे. चालू मान्सून हंगामात १ जून ते १६ सप्टेंबर दरम्यान जिल्ह्यात अपेक्षित सरासरी ३३५.४ मिमी पावसाच्या तुलनेत प्रत्यक्षात केवळ २५५.७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यात पावसाची तब्बल २३.८ टक्के मोठी तूट निर्माण झाल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून, पिण्याच्या पाण्याचा आणि चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ५ लाख हेक्टरवरील पिके धोक्यात आली आहेत.सोयाबीन, कपाशी करपून गेली आहे.जिल्ह्यात यंदा जून आणि जुलै महिन्यात झालेल्या सुरुवातीच्या पावसाच्या जोरावर शेतकऱ्यांनी जवळपास ७ लाख १३ हजार हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरण्या पूर्ण केल्या होत्या. मात्र, ऑगस्ट महिना पूर्णपणे कोरडा गेल्यानंतर सप्टेंबरचा निम्मा पंधरवडा सरला तरी दमदार पावसाने हजेरी लावलेली नाही.यामुळे पिकांची वाढ खुंटली आहे. प्रदीर्घ पर्जन्यखंडामुळे जिल्ह्यातील तब्बल ५ लाख हेक्टर क्षेत्रावरील पिके आता शेतातच जळून जाण्याच्या मार्गावर आहेत.सोयाबीन, कपाशी आणि मका ही पिके पूर्णपणे कोमेजून गेली असून, काही भागांत पिके वाचवण्यासाठी विहिरीच्या पाण्यावर तात्पुरती 'सलाईन' देण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. पावसाने मोठी ओढ दिल्यामुळे जिल्ह्यातील भूजल पातळी वेगाने खाली घसरली आहे. जिल्ह्यातील अनेक पाझर तलाव आणि बंधारे आजमितीस पूर्णपणे कोरडेठाक पडले आहेत. ऐन पावसाळ्यात विहिरी आणि कूपनलिका कोरड्या पडल्याने जिल्ह्यात तीव्र पाणीटंचाई सुरू झाली आहे. जिल्ह्यातील पाथर्डी, नगर, शेवगाव, कर्जत, जामखेड आणि पारनेर या तालुक्यांमधील १०० हून अधिक गावे आणि ५७६ वाड्यांना तीव्र झळ बसली असून, २ लाख २० हजार नागरिकांची तहान भागवण्यासाठी ११४ टँकर्स धावत आहेत. यात एकट्या पाथर्डी तालुक्यात सर्वाधिक ५४ टँकर सुरू आहेत. जिल्ह्यात एकीकडे अकोले तालुक्यातील वाकी आणि शेंडी भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला असताना, दुसरीकडे राहुरीच्या देवळाली, टाकळीमिया महसूल मंडळात केवळ ६३ मिमी पाऊस पडला आहे. संगमनेर, शेवगाव आणि कर्जत तालुक्यांत तर

(पान ३ वर)





डॉ. राजीव सूर्यवंशी
त्वचारोग तज्ज्ञ, ९८२२०३५५८२

## गणराया : ४- नर्तक गणपती

या वर्षी गणेशाची चित्रं वेगवेगळ्या माध्यमातून रंगवायची असं ठरवलं होतं. जलरंग, ॲक्रेलिक, पोस्टर कलर सारखी रंगबिरंगी चित्रं काढल्यानंतर वाटलं एखादं मोनोक्रोम म्हणजे एकरंगी चित्र काढावं. म्हणूनच आजचं हे चित्र चारकोल म्हणजे कोळशाने काढलेले आहे . ह्या चित्रात कोळश्याच्या काड्या, चारकोल पेन्सिल आणि स्मज टूल चा वापर केला आहे.

## निवडक

### डोनाल्ड ट्रम्प आणि भारता दरम्यान पुन्हा टॅरिफ वॉर ची शक्यता १००

**मुंबई, दि.१४–** अमेरिकन काँग्रेसने रशिया आणि इराणवर कठोर निर्बंध लादणारे विधेयक मंजूर केले असून, यामुळे रशियन कच्च्या तेलाची आयात करणाऱ्या भारत आणि चीनसारख्या देशांवर १०० टक्क्यांपर्यंत कर लादण्याचा अधिकार अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना मिळणार आहे.रशियाकडून तेल आणि गॅस खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावण्याचा अधिकार अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना देणारा कायदा अमेरिकन काँग्रेसने मंजूर केला आहे. या विधेयकामुळे भारत आणि चीनसारख्या रशियन तेलाच्या मोठ्या खरेदीदारांवर संभाव्य शुल्काचा धोका निर्माण झाला आहे. अमेरिकेच्या मते रशियाला मिळणाऱ्या ऊर्जा उत्पन्नाच्या माध्यमातून त्याला मिळणारा निधी कमी करणे हा या निर्बंधांचा प्रमुख उद्देश आहे. अमेरिकन काँग्रेसने दोन वर्षांहून अधिक कालानंतर युक्रेनला पाठिंबा देणारे हे प्रमुख विधेयक मंजूर केले आहे. या विधेयकात रशियाच्या कच्च्या तेल आ नैसर्गिक वायूच्या मोठ्या परदेशी खरेदीदारांवर १०० टक्क्यांपर्यंत शुल्क लावण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना देण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवारी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. भारत आपल्या १.४ अब्ज लोकांची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी ठामपणे कटिबद्ध आहे, असे मंत्रालयाने म्हटले आहे.

**'ऊर्जा खरेदी विविध स्रोतांमधून सुरू राहणार'–** भारत आपल्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी विविध स्रोतांमधून खरेदी करण्याचे धोरण कायम ठेवणार आहे. बदलत्या बाजारपेठेतील परिस्थितीनुसार ऊर्जा खरेदीचे निर्णय घेतले जातील, असे परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले.

### शिष्टमंडळाशी सकारात्मक चर्चा; राज्य सरकारला ९० दिवसांचा अल्टिमेटम

# मनोज जरांगे यांनी अखेर उपोषण सोडले!

**समाचार/पाटोदा-दि.१७**

राज्य सरकारच्या शिष्टमंडळाशी झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांनी गेल्या १९ दिवसांपासून सुरू केलेले उपोषण आज गुरुवारी पहाटे सोडले. जरांगे यांनी सरकारला आपल्या मागण्यांसाठी ९० दिवसांचा अल्टिमेटम दिला असून उपोषण सोडले तरी आंदोलन सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. दरम्यान मुंबईत मराठा समाज आरक्षणाच्या मागण्यांसाठी दाखल झालेल्या मराठा बांधवांनी गावी परतण्याचे आवाहन जरांगे यांनी केले असून ते स्वतः छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले आहेत.

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे यांनी गेल्या २९ ऑगस्टपासून आंतरवली सराटी येथे उपोषण सुरू केले होते. मराठा समाजाच्या मागण्यांवर सरकारच्या शिष्टमंडळाने आंतरवली सराटी येथे जात जरांगे यांच्याशी चर्चा केली. मात्र त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी मुंबईत आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. त्यावर मुंबई पोलिसांनी त्यांना आझाद मैदानावर

(पान ३ वर)



### उपोषण सुटल्याने मुख्यमंत्र्यांना आनंद

दरम्यान मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांनी आज पहाटे आपले उपोषण मागे घेतल्याने आपल्याला मनस्वी आनंद झाल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. मराठा आरक्षणाबाबत जरांगे यांनी केलेल्या १३ पैकी १२ मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. काही मागण्यांबाबत कायदेशीर अडचणी आहेत. मंत्रिमंडळ उपसमितीने जरांगे यांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे. दुसरीकडे काँग्रेसचे नेते आ. विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकार जरांगे यांच्यापुढे झुकल्याचे म्हटले आहे.

### वहिनी आहेत ना! नवी टॅगलाईन

## अजित पवार राष्ट्रवादीत सुनेत्रा पवार यांचे रिलॉंचिंग?



**मुंबई –** अजित पवार राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पक्षात रिलॉंचिंग केले जाणार असल्याची माहिती आहे. येत्या २७ सप्टेंबरला नाशिक येथे होणाऱ्या अधिवेशनात पक्षाला नवी उभारी देण्याच्या दृष्टीने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे रिलॉंचिंग केले जाणार असल्याचे समजले. यावेळी अजित पवार राष्ट्रवादीची टॅगलाईन 'वहिनी आहेत ना! अशी करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी अजित पवार राष्ट्रवादी पक्षाची धुरा सांभाळली. राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली. मात्र गेल्या काही दिवसांत अजित पवार राष्ट्रवादीत सर्व काही आलबेल नसल्याचे चित्र पुढे येत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर राजकीय रणनितीकार प्रशांत किशोर आणि त्यांच्या टीमने पक्षाला नवी उभारी देण्याची योजना आखल्याचे सांगितले जाते. त्यानुसार अजित पवार राष्ट्रवादीच्या नाशिक येथे २७ सप्टेंबरला होणाऱ्या अधिवेशनात पक्षाध्यक्षा सुनेत्रा पवार यांचे रिलॉंचिंग करण्याचे तसेच पक्षाची आधीची एकच वादा अजितदादा ही टॅगलाईन बदलून ती आता वहिनी आहेत ना! अशी करण्यात येणार असल्याचे सांगितले जाते. त्याद्वारे पक्षाध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री

(पान ३ वर)

## खंडणीसह जबरी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी स्थानिक गुन्हे शाखेकडून ताब्यात

**समाचार/नगर-दि.१७**

खंडणीसह जबरी चोरीच्या पुण्यातील आरोपी स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतला. फिर्यादी विजय भाऊसाहेब शेळके, वय ४१, रा.गुणवडी, ता.अहिल्यानगर हे श्रीगोंदा येथून घरी येत असताना टाकळी लोणार ते पिसोरे खांड जाणारे रोडवर आरोपी प्रतिक पाचपुते व इतरांनी फिर्यादी व साक्षीदार यांना आडवून त्यांना काठीने व लोखंडी टॉमीने मारहाण करून ५० हजार रूपयाची खंडणी मागीतली.फिर्यादीने रक्कम देण्यास नकार दिल्याने आरोपीनी रोख रक्कम जबरीने काढुन घेतली.याबाबत श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक.संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड पोलीस अंमलदार अतुल लोटके, राहुल द्वारके, निळकंठ कारखेले, शाहीद शेख, बाळासाहेब नागरगोजे, अजिनाथ पाखरे, अमोल कोतकर, प्रताप देवकाते, सागर ससाणे, मनोज साखरे यांनी ही कारवाई केली. गुन्हयातील मुख्य आरोपी प्रतिक गोकुळ पाचपुते

(पान ३ वर)

अहिल्यानगर, सावेडी येथे लवकरच सुरू होत असलेल्या येवल्याच्या सुप्रसिद्ध
सोनी पैठणी - साडी दालनासाठी
– त्वरित पाहिजेत –
* कॅशियर - १ जागा
* अकाउंटंट - १ जागा
* सेल्स पर्सनस (पुरुष-१०, महिला-२०)
* हेल्पर (महिला-६) * वॉचमन -१ जागा
अनुभवींना प्राधान्य.
इच्छुकांनी खालील नंबर वर संपर्क साधावा.
मो. 9665424044, 9422922538
aBhee




# 'रिलायन्स जिओ'मध्ये गुंतवणुकीची संधी



**मुंबई-दि.१७** नवरात्री आणि दिवाळीचा काळ आयपीओ गुंतवणूकदारांसाठी सुवर्णसंधी ठरू शकतो. मुकेश अंबानी यांच्या 'रिलायन्स इंडस्ट्रीज'ची दूरसंचार, डिजिटल आणि तंत्रज्ञान कंपनी, जिओ प्लॅटफॉर्म्स, ऑक्टोबरच्या अखेरीस किंवा नोव्हेंबरच्या सुरुवातीला अंदाजे चार अब्ज डॉलर्सचा आयपीओ लॉंच करण्याची हालचाल करत आहे.

'रिलायन्स जिओ'चा 'आयपीओ' देशांतर्गत शेअर बाजारातील आतापर्यंतचा सर्वात मोठा इश्यू असेल. तसेच २००६ मध्ये 'रिलायन्स पेट्रोलियम'च्या लिस्टिंगनंतर 'रिलायन्स इंडस्ट्रीज ग्रुप'चा हा जवळपास दोन दशकांमधील पहिला आयपीओ असणार आहे. बहुधा जिओ ऑक्टोबरच्या अखेरीस, विशेषतः नवरात्रीच्या दिवसांच्या आसपास आपला 'आयपीओ' लॉंच करण्याच्या तयारीत आहे. लॉंच ऑक्टोबरच्या अखेरीस पुढे ढकलले गेले, तर नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पोहोचू शकतो. नवरात्री नाही, तर कंपनी 'आयपीओ'साठी दिवाळीचे लक्ष्य ठेवू शकते तसेच लॉंचची तारीख निश्चित झाल्यावर कंपनी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी प्रचारात्मक मोहीम सुरू करेल. परदेशात तीन आठवडे आणि भारतात दोन आठवडे रोड शो होतील. नवरात्रीची योजना निश्चित झाल्यास रोडशो पुढच्या आठवड्यापासूनच सुरू होऊ शकतात. ११ ऑक्टोबरला घटस्थापनेसह नवरात्री सुरू होईल आणि २० ऑक्टोबर रोजी दसऱ्याला संपेल. याआधी कंपनीने जूनमध्ये 'आयपीओ'च्या कागदपत्रांचा मसुदा दाखल केला होता आणि सेबीने २८ ऑगस्ट रोजी मंजुरी दिली.

बँकर्सच्या अंदाजानुसार 'जिओ'च्या 'आयपीओ'मधून सुमारे ३७ हजार ८०० कोटी रुपये उभारले जाऊ शकतात. अशा प्रकारे 'ह्युंदाई'चा रेकॉर्ड मोडून 'जिओ' आतापर्यंतचा सर्वात मोठा 'आयपीओ' बनेल. याआधी 'ह्युंदाई मोटर इंडिया'ने (२७ अब्ज रुपये) भारतीय बाजारातील सर्वात मोठा 'आयपीओ' इश्यू लॉंच केला होता, तर 'जिओ'व्यतिरिक्त एनएसईचा ३१ हजार कोटींचा 'आयपीओ'ही अजून लॉंच होणार आहे.

संपादकीय

# खरा लाभ घेणार कोण?

भारताने वर्षभर 'ब्रिक्स'चे अध्यक्षपद सांभाळल्यानंतर अलिकडे दिल्लीमध्ये झालेल्या या परिषदेत ग्लोबल साऊथ, बहुध्रुवीय जग, व्यापार, तंत्रज्ञान, ऊर्जा, पुरवठा साखळी आणि स्थानिक चलनांमधील व्यापार अशा अनेक विषयांवर चर्चा झाली. विस्तारित ब्रिक्स आता चार खंडांमध्ये पसरलेला गट बनला आहे. त्यामुळे त्याचे आर्थिक आणि राजनैतिक वजन पूर्वीपेक्षा निश्चितच वाढले आहे; मात्र या सर्व चर्चांच्या पार्श्वभूमीवर एक अस्वस्थ करणारा प्रश्न उपस्थित होतो, तो म्हणजे 'ब्रिक्स'च्या वाढत्या प्रभावाचा सर्वाधिक फायदा भारताला होणार की चीनला? हा प्रश्न भारत-चीन संबंधांच्या संदर्भात अधिक महत्त्वाचा ठरतो. कारण ब्रिक्समध्ये भारत आणि चीन हे दोन्ही प्रमुख देश असले, तरी त्यांची आर्थिक स्थिती आणि व्यापारातील परस्परसंबंध समसमान नाहीत. उलट, चीनसोबतच्या व्यापारात भारताची मोठी तूट आहे. केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार एप्रिल-ऑक्टोबर २०२५ मध्ये चीनसोबतची भारताची व्यापारतूट ६३.९७ अब्ज डॉलरवर पोहोचली होती. याच काळात चीनला भारताची निर्यात २४.७ टक्क्यांनी वाढून १०.०२ अब्ज डॉलर झाली, ही सकारात्मक बाब असली, तरी आयातीच्या तुलनेत निर्यात अद्याप खूपच कमी आहे. यातून 'ब्रिक्स'चे मूलभूत द्वंद्व स्पष्ट होते. एकीकडे भारताला ब्रिक्सच्या माध्यमातून अमेरिकाकेंद्रित जागतिक व्यवस्थेला पर्याय निर्माण करणाऱ्या मंचात महत्त्वाची भूमिका बजावायची आहे. दुसरीकडे, चीन या मंचाचा वापर स्वतःचे आर्थिक आणि राजनैतिक प्रभावक्षेत्र वाढवण्यासाठी करू शकतो. त्यामुळे 'ब्रिक्स' म्हणजे भारतासाठी संधी की चीनसाठी प्रभावविस्ताराचे साधन, हा प्रश्न सरळ हो किंवा नाही मध्ये सोडवता येणार नाही. चीनमधून होणाऱ्या अनेक आयाती या कच्चा माल, मध्यवर्ती वस्तू आणि भांडवली वस्तूंच्या स्वरूपात आहेत, ज्या भारतातील उत्पादन आणि निर्यातीतही वापरल्या जातात. म्हणून चीनकडून होणारी प्रत्येक आयात वाईट आणि भारताची प्रत्येक निर्यात चांगली, असा सरळ निष्कर्षही चुकीचा ठरेल; मात्र प्रश्न असा आहे, की भारत स्वतःच्या उत्पादन साखळ्या किती मजबूत करणार? मोबाईल फोनपासून सौर पॅनेलपर्यंत, इलेक्ट्रॉनिक्सपासून औषधांच्या घटकांपर्यंत आणि यंत्रसामग्रीपासून रसायनांपर्यंत भारताला आयातीवरील अवलंबित्व कमी करावे लागेल. अन्यथा, ब्रिक्सचा विस्तार झाला, तरी भारताच्या व्यापारतुटीचा प्रश्न कायम राहू शकतो. भारतासमोर याहून मोठे धोरणात्मक द्वंद्व आहे. एका बाजूला चीनसोबत सीमा आणि सुरक्षेचे प्रश्न आहेत. दुसऱ्या बाजूला चीन हा भारताचा महत्त्वाचा व्यापारी भागीदार आहे. अशा परिस्थितीत पूर्ण आर्थिक ताटातूट शक्यही नाही आणि आवश्यकही नाही; परंतु आर्थिक परावलंबित्व कमी करणे आवश्यक आहे. ब्रिक्समध्ये भारताने चीनशी स्पर्धा करण्याऐवजी स्वतःची आर्थिक क्षमता वाढवण्यावर भर दिला पाहिजे. चीनमधून आयात होणाऱ्या वस्तूंचे देशांतर्गत उत्पादन वाढवणे, भारतीय कंपन्यांना जागतिक पुरवठा साखळीत सामील करणे, संशोधन-विकासाला चालना देणे आणि 'ब्रिक्स'च्या बाजारपेठेत भारतीय उत्पादनांची उपस्थिती वाढवणे ही खरी रणनीती असली पाहिजे. 'ब्रिक्स'मधील स्थानिक चलनांचा व्यापार त्यानंतरच अर्थपूर्ण ठरेल. भारताने एकाच वेळी अमेरिका, युरोप, रशिया, जपान, ऑस्ट्रेलिया, आखाती देश आणि 'ग्लोबल साऊथ'शी संबंध सांभाळण्याचे धोरण स्वीकारले आहे. ब्रिक्स भारताला चीन आणि रशियासोबत संवाद ठेवण्याचे व्यासपीठ देते, तर दुसरीकडे पाश्चिमात्य देशांशी भारताचे स्वतंत्र संबंधही कायम आहेत. नवी दिल्लीतील परिषदेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यात झालेल्या चर्चेत व्यापारातील असमतोल, पुरवठा साखळी आणि बाजारपेठेतील प्रवेश या मुद्द्यांवर चर्चा झाली. यातून मिळणारा महत्त्वाचा संदेश म्हणजे स्पर्धा आणि सहकार्य एकाच वेळी चालू शकते. भारताने चीनकडे शत्रू म्हणून पाहून सर्व संबंध बंद करण्याची भूमिका घेण्याची गरज नाही; तसेच चीनच्या आर्थिक शक्तीसमोर झुकण्याचीही गरज नाही. हितसंबंध जुळतात तिथे सहकार्य आणि राष्ट्रीय हिताला धोका आहे तिथे सावध स्पर्धा, हीच व्यावहारिक दिशा ठरू शकते. भारताने ब्रिक्समध्ये चीनच्या प्रभावाला घाबरण्यापेक्षा स्वतःची आर्थिक ताकद वाढवण्याची गरज आहे. ब्रिक्स हे चीनकेंद्रित व्यासपीठ होऊ नये. या पार्श्वभूमीवर भारताने तीन बाबी साध्य केल्या पाहिजेत. पहिली,ब्रिक्सच्या विस्तारातून भारतीय निर्यातीसाठी नवीन बाजारपेठा मिळवणे, दुसरी म्हणजे स्थानिक चलनातील व्यापाराचा फायदा भारतीय उद्योगाला मिळवून देणे आणि तिसरी चीनसोबतच्या व्यापारातील असमतोल कमी करण्यासाठी देशांतर्गत उत्पादनक्षमता वाढवणे.ब्रिक्सच्या माध्यमातून चीनला अधिक बाजारपेठ मिळू शकते, हे वास्तव आहे; पण भारताला त्याच व्यासपीठातून अधिक बाजारपेठ, अधिक गुंतवणूक, अधिक तंत्रज्ञान आणि अधिक राजनैतिक प्रभाव मिळवता येऊ शकतो, हेही खरे आहे, म्हणून प्रश्न ब्रिक्सचा फायदा भारताला की चीनला, एवढाच नसावा; ब्रिक्सच्या वाढत्या सामर्थ्याचा वापर भारत स्वतःच्या राष्ट्रीय हितासाठी किती प्रभावीपणे करतो, हा खरा मुद्दा आहे. कारण चीनला ब्रिक्समधून फायदा होणारच. भारताला तो पदरात पाडून घ्यावा लागणार. फरक इतकाच, की चीन आपली उत्पादनशक्ती आणि निर्यातशक्ती घेऊन ब्रिक्समध्ये येतो. भारताने आपली उत्पादनशक्ती आणि निर्यातशक्ती वाढवून ब्रिक्सचा वापर केला, तरच या मंचाचे आर्थिक समीकरण भारताच्या बाजूने झुकेल. त्यामुळे ब्रिक्सचा खरा कस नवी दिल्लीतील घोषणांमध्ये नसून भारतीय कारखान्यांमधील उत्पादन, भारतीय बंदरांवरील निर्यात आणि भारताच्या व्यापारतुटीतील बदलांचा असेल.

## मुकुंदनगर प्रवेशद्वारासमोर गतीरोधक बसविण्याची मागणी



**समाचार/नगर-दि.१७**

संभाजीनगर ते पुणे रोडदरम्यान मुकुंदनगर प्रवेशद्वारा जवळील मुख्य रस्त्यावर स्पीड ब्रेकर बसवावेत, अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे. याबाबत अहिल्यानगर जागतिक बँक प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन देण्यात आले.

संभाजीनगर ते पुणे रोडदरम्यान मुकुंदनगर हा दाट लोकवस्तीचा परिसर असून, या भागात महानगरपालिका कार्यालयासह विविध शासकीय कार्यालये आहेत. तसेच सकाळच्या वेळेत शाळकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने या रस्त्यावरून ये-जा करतात. या मार्गावरून वाहने वेगाने ये-जा करत असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे मुकुंदनगर प्रवेशद्वाराजवळील मुख्य रस्त्यावर तातडीने स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या मार्गावर वन कार्यालयासमोर पूर्वी स्पीड ब्रेकर बसविण्यात आले होते. मात्र, रस्त्याच्या पॅचिंगच्या कामामुळे ते नष्ट झाले आहेत. त्यामुळे या ठिकाणी पुन्हा स्पीड ब्रेकर बसवावा. तसेच पुणे ते संभाजीनगर या विरुद्ध दिशेच्या मार्गावरील पूर्वीचे स्पीड ब्रेकरही पूर्ववत करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

## सामूहिक अन्नवाटपासाठी पूर्वपरवानगी आवश्यक

**समाचार/नगर-दि.१७**

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर सामूहिक अन्नवाटप, महाप्रसाद, भंडारा आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. अशा सामूहिक अन्नवाटपासाठी अन्न औषध प्रशासनाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. यासाठी आयोजकांनी अन्न औषध प्रशासनाच्या http://festivals.mahafda.in या ऑनलाइन पोर्टलवर विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

महाप्रसाद, भंडारा तसेच इतर कोणत्याही स्वरूपात मोफत अन्नप्रसादाचे वाटप करण्यात येणार असल्यास संबंधित आयोजकांनी कार्यक्रमाच्या किमान ७ दिवस आधी आवश्यक माहिती भरून ऑनलाइन पोर्टलद्वारे अन्न औषध प्रशासनाकडे परवानगी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळे, नवरात्रोत्सव मंडळे तसेच विविध सण-उत्सवानिमित्त सामूहिक अन्नवाटपाचे आयोजन करणाऱ्या संस्था व आयोजकांनी विहित मुदतीत अन्न औषध प्रशासनाकडे ऑनलाइन अर्ज दाखल करून पूर्वपरवानगी प्राप्त करावी. पूर्वपरवानगी घेतल्यानंतरच अन्नवाटपाचे आयोजन करावे, असे आवाहन अन्न औषध प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# लेझर लाईट मिरवणुकीत नको

विज्ञान भारती



तरुणांनो, तुम्हाला किती वेळा सांगायचे व कसे सांगायचे रे. या लेझर लाईट तुमच्या शरीरा करता अत्यंत अपायकारक आहेत हे तुम्हाला समजत कसे नाही. तुम्ही तुमच्या बरोबरच दुसऱ्या भाविकांना विशेष करून बालकांच्या शरीरावर अपायकारक लेझर लाईटचा मारा करत आहेत. गणेश विसर्जन मिरवणुकीत किंवा गणेश देखाव्यांमध्ये या लाईट अजिबात नको.

श्री गणेश विसर्जन मिरवणूक येत्या काही दिवसात निघणार आहे. गेल्या काही वर्षांपासून या विसर्जन मिरवणुकीमध्ये मोठ्या प्रमाणावर डिजे वाजवले जातात. यावर्षी गणेश स्थापनेच्या दिवशी बऱ्याच प्रमाणात पारंपारिक वाद्यांना किंवा कमी आवाजातील डीजेंना तरुणांनी प्राधान्य देत पहिला दिवस थोडा सुसह्य केला.

मागील चार-पाच वर्षांत विसर्जन मिरवणुकीमध्ये विविध प्रकारचे लेझर लाईट सुद्धा मोठ्या प्रमाणावर वापरणे सुरू झाले आहे. या लाईट आपल्या शरीरासाठी अत्यंत घातक आहेत. या लाईटस पासून गणेश मंडळांनी दूर राहणे गरजेचे आहे. यामुळे फक्त मंडळातील तरुण तरुणींनाच नाही तर विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी येणारे भक्तगण व ज्या भागातून ही मिरवणूक चालली आहे त्या भागातील नागरिकांकरता सुद्धा अत्यंत घातकच आहे.

डेसिबल हे ध्वनीची किंवा आवाजाची तीव्रता मोजण्याचे एकक आहे. विसर्जन मिरवणुकीमध्ये १०० डेसिबल पेक्षा जास्त आवाज या डीजे मार्फत तयार केला जातो. मग आता कल्पना करा किती मोठ्या प्रमाणावर या ध्वनी लहरी आपल्या शरीरावर आदळतात व त्यामुळे अनेक गंभीर आजार आपणास होतात. आपण पेपरमध्ये वाचलेच असेल की अनेकांचे जीव मोठया प्रमाणावरील ध्वनी मुळे हृदयविकार होऊन गेले आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये सार्वजनिक मिरवणुकीमध्ये लेझर लाईट सुद्धा मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. या लेझर लाईट्स मधून अनेक घातक किरणे पडतात व ती आपल्या डोळ्याला अपाय करतात. लेझर म्हणजे काय हो डळसहीं ाश्रिलषळलरींलेप लू डींलीश्रिरींशव एलीीलेपी`ष ठरवळलरींलेप (डडएठ). थोडक्यात ही सुद्धा एक ऊर्जा आहे. आपण अनेक ठिकाणी वाचले असेल की लेझर कटिंग करून एखाद्या क्रीलिक शिट कट करायचे किंवा एखादा पत्रा कट करायचा म्हणजे किती ताकद या लेझर किरणांमध्ये आहे. ही लेझर किरणे आकाशात सोडल्यास ही अनेक मैल तशीच्या तशी जाऊ शकतात. वैमानिकांना सुद्धा ती अपायकारक ठरू शकतात. इतकी ताकद यांच्यामध्ये आहे. हि लेझर किरणे आपण निष्कारण तयार करून मिरवणुकीमध्ये त्यांचा सर्रास वापर करतो. यामुळे आपल्या सर्वांना त्रास होणार आहे हे आपण समजून घेतले पाहिजे.

हि लेझर किरणे अत्यंत केंद्रित, तीव्र व एकाच रंगाच्या प्रकाश लहरींची करतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये प्रचंड ऊर्जा असते. सार्वजनिक ठिकाणी दिसणारी ही लेझर किरणे एक विशिष्ट प्रोजेक्टर, लाईट, प्रगत ऑप्टिक्स उपकरणे यांचा वापर करून केली जातात. ती कोणत्याही परिस्थितीत लोकांच्या डोळ्यावर जाईल अश्या प्रकारे सोडली गेली नाही पाहिजेत.

या लेझर लाईट मुळे डोळ्यांना अंधुकपणा येतो. काही जणांना या लाईटच्या डोळ्याशी संपर्क आल्यास डोळ्यासमोर काही काळ काळी ठिपके किंवा काळी वर्तुळे सुद्धा दिसतात. हि लेझर किरणे डोळ्याच्या आतल्या पडद्यावर आदळतात. डोळ्याच्या या आतल्या पडद्याला आपण रेटिना म्हणतो. या रेटीना मध्ये हे रक्तस्त्राव निर्माण करू शकतात किंवा रेटिना मध्ये नजरेसाठी आवश्यक असलेल्या भागावर इजा करून कायमस्वरूपी हानी करू शकतात. यामुळे आपल्या दृष्टीवर खूप मोठा परिणाम होऊ शकतो. या सर्व बाबी अत्यंत घातक आहेत. एखादी व्यक्ती या लेझर लाईटच्या अनेक काळ संपर्कात राहिल्यास व त्याला अशी काही लक्षणे दिसल्यास त्यांनी त्वरित नेत्र तज्ञांचा सल्ला घेणे अत्यंत गरजेचे आहे. पेपर मध्ये आपण हे सुद्धा वाचले असेल की या लेझर लाईट मुळे काही जणांना कायमस्वरूपी अंधत्व आलेलं आहे. दरवर्षी आपण पेपर मध्ये हे सुद्धा वाचतो की विसर्जन मिरवणुकीनंतर अनेकांच्या डोळ्यांना त्रास झाला आहे. पालकांनी सुद्धा आपल्या मुलांना याबाबतीत जागृत केले पाहिजे.

तरुणांनो, आपले आयुष्य अनमोल आहे. उत्साहाच्या भरात असा कोणताही वेडेपणा करू नका व आपल्याबरोबर इतरांनाही त्रास होईल असे कृत्य करू नका. आशा करूया या येत्या विसर्जन मिरवणुकीत पारंपारिक वाद्य वाजवू व लेझर लाइट्स पूर्णपणे बंद ठेवू.

**- डॉ.दत्ता पोंदे**

मोबाईल- ७३८७९००७००




### राशीभविष्य

- **मेष** : कोणावर अतिविश्वास टाकू नका. परिस्थितीत अनुकूल बदल होतील. आर्थिक बाबतीत विचार करा.
- **वृषभ** : विचारपूर्वक बोलणं हिताचं ठरेल. ज्येष्ठांचा सल्ला कामी येईल. तुर्तास गुंतवणुकीचा विचार करू नये.
- **मिथुन** : कार्यक्षेत्रात आपली बाजू वरचढ ठरेल. वरिष्ठांशी सल्लामसलत महत्त्वाची राहील. बाकी चिंता नको.
- **कर्क** : व्यवसायात स्थिती साधारण राहील. आर्थिक व्यवहार विचारानं करावे. विद्याथर्थ्यांना यश लाभेल.
- **सिंह** : कार्यक्षेत्रात इतरांशी जमवून घ्या. जमा-खर्चाचा ताळमेळ राखावा. कौटुंबिक मतभेद टाळायला हवे.
- **कन्या** : अनावश्यक खर्च टाळावा. वरिष्ठांच्या तुमच्याकडून अपेक्षा वाढतील. पित्ताचे विकार संभवतात.
- **तूळ** : तुमच्या कर्तृत्त्वाची इतरांवर छाप पडेल. हाती घेतलेलं कार्य सफल होईल. हातून शुभकार्य घडेल.
- **वृश्चिक** : व्यवसायवृध्दीच्या उत्तम संधी लाभतील. नोकरीत बदली, बढतीचे योग आहेत. समाधानी रहाल.
- **धनु** : जबाबदारीची जाणीव ठेवावी. नव्या ओळखी कामी येतील. प्रवासात मौल्यवान वस्तू सांभाळाव्या.
- **मकर** : कामात सातत्य आणि चिकाटी ठेवावी. भावनेपेक्षा कर्तव्याला महत्त्व द्या. गुंतवणूक विचारानं करावी.
- **कुंभ** : कामाचा व्याप वाढेल. धावपळ, दगदगीमुळे प्रकृती अस्वास्थ राहील. विद्यार्थ्यांना अनुकूलता राहील.
- **मीन** : मिळणाऱ्या संधींचा लाभ घ्यावा. स्थावर बाबतीत समाधान लाभेल. गैरसमजांपासून दूर रहावं.

### दिनविशेष

**१८ सप्टेंबर**

- **२००४ :** साहित्यिक डॉ. भालचंद्र दिनकर फडके यांचे निधन.
- **२००७ :** पाकिस्तानच्या अध्यक्षपदी निवडून आल्यावर जनरल परवेझ मुशर्रफ लष्करप्रमुखपदाचा राजीनामा देणार.
- **२०१४ :** भारत आणि चीनदरम्यान दिल्लीत शिखर बैठकीदरम्यान चुमारमध्ये चिनी सैनिकांची घुसखोरी.
- **२०१७ :** देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने रोहिंग्या मुस्लिमांचं वास्तव्य हानिकारक असल्याचं सर्वोच्च न्यायालयात केंद्राचं प्रतिपादन.

### आरोग्यमंत्र — योग्य व्यायाम कोणता ?

उत्तम पचनक्रिया, नीट चालणारी शरीरप्रणाली, सहज होणा-या हालचाली आणि चांगली रोगप्रतिकारशक्ती ही सगळी चांगल्या तंदुरुस्तीची लक्षणं आहेत. नेहमीची कामं केल्यावरसुद्धा जर आणखी कामं करण्यासाठी उत्साह वाटत असेल तर ते उत्तम प्रकृतीचं लक्षण आहे. अर्थातच वेगवगेळया वयोगटासाठी हे मोजमाप वेगळं असतं. वयाच्या १५ ते ३० वयापर्यंत भरपूर शारिरीक मेहनत , खेळ आणि बौद्धिक श्रम न थकता करणारी व्यक्ती ही चांगल्या प्रकृतीची म्हणता येईल. तर वयाच्या ३० ते ६० वर्षांपर्यंत आटोक्यात ठेवलेलं वजन आणि रोजच्या कामातील उत्साह सांभाळून ठेवणारी व्यक्ती तंदुरुस्त समजायला हरकत नाही. वयाच्या साठीनंतर मनाचं समाधान कायम ठेवून जीवन जगण्याचा उत्साह टिकवणारी व्यक्ती पूर्ण तंदुरुस्त आहे हे निश्चित. आजच्या जीवनपद्धतीमध्ये शरीराला नियमित कष्ट फारसे नसतात. त्यामुळे नियोजनपूर्वक व्यायाम करण्याची गरज आहे. व्यायाम कमीतकमी ६ मिनिटं आणि जास्तीत जास्त ४५ मिनिटं करावा. व्यायाम सलगपणे त्यात मोठा विराम न घेता करावा. व्यायाम झाल्यावर सुमारे दहा मिनिटात हृदयाचे ठोके पूर्ववत होतील एवढाच व्यायाम करावा. सुरुवातीचा व्यायाम आपल्या एकूण क्षमतेच्या ६० टक्के एवढाच करावा. शरीराच्या सर्व स्नायूंना व्यायाम होईल अशी रचना असावी. स्नायूंना जास्तीत जास्त ताण पडावा असं पाहावं. पोटाचे, पाठीचे, हातांच्या, दंडांच्या स्नायूंचे, कमरेचे आणि श्वासोश्वासाचे असे सर्व प्रकारचे व्यायामप्रकार आपल्या आराखडयात असावेत.



### अजब गजब — लाबच लांब नद्या

जगातील काही नद्यांची लांबी ऐकून आपण थक्क होतो.

✻ 'नाईल' ही जगातली सर्वात लांब नदी आहे. ही नदी उत्तर-पूर्व आफ्रिकेतून वाहते. नाईलची लांबी जवळपास ६६५० किलोमीटर आहे. ही नदी भूमध्य समुद्राला मिळते. ✻ ॲमेझॉन ही जगातली दुसऱ्या क्रमांकाची लांब नदी आहे. ही नदी दक्षिण अमेरिकेतून वाहते. या नदीची लांबी ६४०० किलोमीटर आहे. ॲमेझॉन नदीची लांबी नाईलपेक्षा कमी असली तरी तिच्या पाण्याची घनता जास्त आहे. ✻ 'यांगत्जी' ही नदी चीनमधून वाहते. ती आशिया खंडातली सर्वात मोठी नदी आहे. तिचा लांबीच्या बाबतीत जगात तिसरा क्रमांक लागतो. 'यांगत्जी' नदी ६३०० किलोमीटर लांब आहे. या नदीला चीनमध्ये 'चेन जियांग' असंही म्हटलं जातं. 'मिसीसिपी-मिसौरी' ही जगातली चौथ्या क्रमांकाची नदी असून अमेरिकेतली सर्वात मोठी नदी आहे. या नदीची लांबी ६२७५ किलोमीटर आहे. मिसौरी ही मिसिसिपीची उपनदी आहे. 'येनिस-अंगारा-सेलेंगा' या रशिया आणि मंगोलियातून वाहणाऱ्या तीन नद्या एकमेकींशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे लांबीच्या बाबतीत त्यांचा जगात पाचवा क्रमांक लागतो.

### फॅशन पॅशन

हिरवा रंग म्हणजे समृद्धीचं प्रतीक. हिरव्या रंगात वेगळीच जादू असते. या रंगाच्या विविध छटा खूप छान दिसतात. पण मुलांच्या वॉर्डरॉबमध्ये हिरवा रंग अभावानेच आढळतो. हिरव्या रंगाचा शर्ट शहसा घेतला जात नाही. मुलांचा वॉर्डरॉब निळ्या रंगाच्या शर्टसनी भरलेला असतो. आकाशी, गडद निळा, नेव्ही ब्लू, रॉयल ब्लू अशा रंगांच्या शर्ट, टी शर्टसचा खच पडलेला असतो. हे रंग छान दिसत असले तरी तुम्ही काहीतरी ट्रेंडी ट्राय करायला हवं. हिरव्या रंगाचा शर्ट तुमच्या वॉर्डरॉबमध्ये असायला हवा. या रंगामुळे तुमचं वेगळेपण उठून दिसेल. **(क्रमश:)**

### स्टाईल स्टेटमेंट — स्टायलिश बॉटम्स

सलवार-कमीझ हा पेहराव कोणत्याही प्रसंगी शोभून दिसतो. ऑफिस असो किंवा सणसमारंभ... आरामदायी सलवार कमीझ घालण्यावर महिलांचा भर असतो. पण बॉटम म्हणून प्रत्येक वेळी सलवारच कॅरी करायला हवी असं नाही. तुम्ही विविध प्रकारच्या बॉटम्सनी आपला लूक खुलवू शकता. अशाच काही ट्रेंडी बॉटम्सवर एक नजर टाकू या.

✻ धोती सलवार हा प्रकार सध्या बराच इन आहे. ही सलवार शॉर्ट आणि लाँग कुर्त्यासह अनारकली कुर्त्यासोबतही कॅरी करता येईल. यामुळे तुम्हाला वेगळा लूक मिळेल.

✻ मधल्या काळात सिगारेट पँट हा प्रकार लोकप्रिय ठरला आहे. चुडीदारऐवजी सिगारेट पँट्स ट्राय करा. ए लाईन कुर्त्यासोबतच अनारकलीवरही ही स्टाईल शोभून दिसेल. **(क्रमश:)**

### पंचांग

**शुक्रवार, १८ सप्टेंबर २०२६**

पराभवनाम संवत्सर शके १९४८, भाद्रपद शु. ७, चंद्रराशी : वृश्चिक, नक्षत्र : ज्येष्ठा, योग : प्रीति, सूर्योदय ६.२९, सूर्यास्त ६.३७

### फॉरवर्ड्स

**बस्स इतनी सी बात साहेबानों क़ो ख़ल ग़यी...**

**हमारीं कागज़ क़ी कश्ती तूफ़ानों में कैसें चल ग़यी...!**

### करिअरवाटा — माध्यमांमधल्या नव्या संधी...

प्रसिध्दी माध्यमांच्या या बहरत्या काळात आवाज दमदार, उच्चार शुद्ध आणि आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडींकडे सजगतेनं पाहण्याची वृत्ती असेल तर या क्षेत्रातील उत्तम कारकिर्द घडू शकते. इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रिंट मीडिया, वेब पत्रकारिता, रेडिओमधील करीअर आदी पर्यायांमधून योग्य क्षेत्रामध्ये शिरकाव करणं शक्य आहे. अँकरिंग, वृत्तनिवेदन, संशोधन आदी क्षेत्रांमध्ये कारकिर्द घडवणं शक्य आहे. आजकाल ऑन स्पॉट रिपोर्टिंग हा विषयही तरूणाईच्या आकर्षणाचं केंद्र बनत आहे. रेडिओचा वाढता वापर अनेक संधी देऊ करत आहे. इथं 'आर जे' (रेडिओ जॉकी) म्हणून कारकिर्द घडवता येते. सफल आर जे होण्यासाठी घटनांचा अभ्यास करण्याची सवय महत्त्वपूर्ण ठरते. मनोरंजनाबरोबर माहिती देणारा आरजे लोकांच्या पसंतीस उतरतो. त्यादृष्टीने अनेक संस्थांनी यासंबंधीचे छोटे-मोठे अभ्यासक्रम उपलब्ध केले आहेत. पत्रकार म्हणून काम करण्यासाठी बातम्या शोधणं, त्याच्या मुळापर्यंत जाणं आणि लोकांपर्यंत सत्य पोहोचवणं गरजेचं असतं. यासाठी इच्छुकांच्या अंगी निर्भयता हा गुण असायला हवा. संपादक म्हणून काम करायचं असल्यास आणखी काही कौशल्यं आत्मसात करावी लागतात.



### खेचाखेची — क्लास

**रिक्षावाला** - बोला साहेब, कुठे जाणार?

**गंपू** - नवी मुंबईला.

**रिक्षावाला** - पण साहेब, कोणत्या क्लासने जायचं ते सांगा.

**गंपू** - आं... रेल्वेतला क्लास माहितीय. पण रिक्षात क्लास?

**रिक्षावाला** - फर्स्ट क्लासमध्ये म्युझिक चालू आणि खड्डे चुकवून रिक्षा चालवणार. सेकंड क्लासमध्ये म्युझिक बंद आणि फक्त खड्ड्यातून रिक्षा चालवणार.

**गंपू** - आणि थर्ड क्लास ?

**रिक्षावाला** - मी मागे बसणार तुम्ही रिक्षा चालवायची...!

### वेगळं काही

सोशल मीडियावर फोटो अपलोड करण्यासाठी तुम्ही मित्रमैत्रिणी भाड्याने घेऊन शकता. जपानमधल्या 'रिअल अपील' या कंपनीने ही सोय उपलब्ध करून दिली आहे. या भाड्याच्या मित्रमैत्रिणींसोबत तुम्ही मजा करू शकता, भरपूर फोटो काढू शकता आणि हे फोटो सोशल मीडियावर अपलोडही करू शकता. या कंपनीतले कर्मचारीच मित्रमैत्रिणी म्हणून जातात. त्यांच्यासोबत दोन तास घालवण्यासाठी आठ हजार येन मोजावे लागतात. या मित्रमैत्रिणींसोबत तुम्ही कितीही फोटो काढू शकता आणि सोशल मीडियावर अपलोडही करू शकता. या भाड्याच्या मित्रमैत्रिणींच्या प्रवासाचा आणि खाण्यापिण्याचा खर्च ग्राहकांनाच करावा लागतो.

### फॅशन पॅशन — लेहंगा व शर्टची नवी स्टाईल



लेहंगा हा एव्हरग्रीन फॅशन ट्रेंड असला तरी त्यातही वैविध्य आणता येतं. तुम्ही वेगळ्या पद्धतीनेही लेहंगा कॅरी करू शकता. तुमच्याकडे शर्ट असेल तर लेहंग्यासोबत शर्ट कॅरी करता येईल. हा शर्ट लेहंग्यात इन करायचा असतो. समजा तुम्हाला जुना लेहंगा कॅरी करायचा आहे. अशा वेळी हीच कल्पना लढवायची. भारीतला शर्ट आणायचा आणि लेहंग्यासोबत घालायचा. यामुळे अगदी हटके लूक मिळेल. लेहंग्यासोबत शर्ट ही कल्पना थोडी विचित्र वाटत असली तरी हे कॉम्बिनेशन खूप छान दिसतं. तुम्ही मिक्स अँड मॅचही करू शकता. अर्थात वेगवेगळे प्रयोग करायला वाव आहेच. म्हणजे तुम्ही कंबरेला छानसा पट्टा बांधू शकता. कलर ब्लॉकिंग ट्राय करू शकता. शर्टवर एखादं जॅकेट घालून लूक खुलवू शकता. काही सेलेब्जनी तर लेहंग्यावर टी शर्ट घालण्याचा ट्रेंडही आणला आहे. टी शर्ट आवडत नसेल तर शर्टचा ऑप्शन आहेच. थोडं गुगल सर्च करा. तिथे सेलेब्जचे शर्ट आणि लेहंगा लूकमधले फोटो नक्कीच मिळतील. त्यांच्याकडून प्रेरणा घ्या. मग काय, आगामी सणांना हा लूक ट्राय करणार ना?

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra.
Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

### अर्ज़ किया है...

*जब प्यार नहीं है तो भुला क्यूँ नहीं देते*
*ख़त किस लिए रक्खे हैं जला क्यूँ नहीं देते*

**- हसरत जयपुरी**

हा शेर मुखाने नाकारलेल्या प्रेमाच्या मागे लपलेल्या अप्रत्यक्ष ओढीला आणि आठवणींना धरून ठेवण्याच्या वेदनेला अत्यंत प्रभावीपणे व्यक्त करतो. जर नाते संपले असेल, तर आठवणींचे अवशेष जपून ठेवून स्वतःला आणि दुसऱ्याला त्रास का देताय, असा सवाल कवी यात करत आहे.


# समाचार

गुरुवार दि. १७ सप्टेंबर २०२६ पान ३


## राधाकृष्ण विखे; अभियंता गौरव पुरस्कारांचे वितरण

# नाविन्यपूर्ण संशोधनातून सिंचन व्यवस्था सक्षम करा

**समाचार/नगर-दि.१७**

नाविन्यपूर्ण संशोधन आणि प्रभावी अंमलबजावणीमध्ये अभियंत्यांनी व्यापक दृष्टिकोन ठेवला, तरच सिंचन व्यवस्था अधिक सक्षम होऊन दुष्काळी भागाच्या अपेक्षा पूर्ण होऊ शकतील, असे मत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केले.



जलसंपदा विभागाच्या वतीने यशवंतराव चव्हाण विकास व प्रशासन प्रबोधिनी येथे आयोजित 'अभियंता गौरव पुरस्कार' सोहळ्याचे वितरण जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी जलसंपदा मंत्री तथा विद्यमान मंत्री गिरीष महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

या कार्यक्रमास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, प्रकल्प समन्वय सचिव जयंत बोरकर, लाभक्षेत्र विकास विभागाचे सचिव प्रकाश मिसाळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक हनुमंत धुमाळ, गोदावरी खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक जयंत गवळी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक सुदर्शन पगार, तापी खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश मोरे आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले की, राज्यातील शेती आणि जलव्यवस्थेसाठी अभियंत्यांनी दिलेले योगदान खूप मोठे आहे. या पुरस्काराच्या माध्यमातून त्यांच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव होत असून, जलसंपदा विभागातील अनुभवी अधिकारी व अभियंत्यांनी प्रदीर्घ काळात केलेल्या कामामुळेच राज्याच्या सिंचन क्षेत्रात भरीव सुधारणा होत आहे.

मंत्री गिरीष महाजन म्हणाले की, जलसंपदा विभागातील अभियंते आणि अधिकाऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे महाराष्ट्राच्या जलविकासाला मोठी चालना मिळाली आहे. धरणे बांधण्याबरोबरच त्यातील पाणी शेवटच्या शेतकऱ्याच्या शेतांपर्यंत पोहोचविणे आणि पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा कार्यक्षम वापर करणे हेच आपल्या विभागाचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे. जलसंपदा विभाग हा राज्याच्या विकासाचा मुख्य कणा आहे. पाईपद्वारे वितरण प्रणाली, ठिबक व तुषार सिंचनामुळे पाण्याची गळती व बाष्पीभवन कमी करण्यावर अधिक भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी २०१९ ते २०२४ या कालावधीतील वैयक्तिक व सांघिक पुरस्कारार्थींचा गौरव करण्यात आला.

## नागरिकांच्या हरकतींपूर्वीच नगरसेवकांनी बदलला विकास आराखडा- शाकीर शेख

**समाचार/नगर-दि.१७**

शहराच्या पुढील वीस वर्षांच्या विकासाची दिशा ठरविणाऱ्या सुधारीत प्रारूप विकास योजनेत राजपत्रीय प्रसिध्दीपूर्वीच नगरसेवकांच्या सूचनांनुसार आरक्षणे, रस्ते आणि जमीन वापरात बदल करण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी केला. दि. ३० जुलै २०२६ चा विषय, ठराव क्र. २३ तात्काळ स्थगित करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१ (१) व ४५१ (३) अन्वये विखंडीत करावा तसेच आयुक्त यशवंत डांगे यांची विभागीय चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे केली आहे.

अधिकृत अभिलेखांनुसार नगररचना अधिकारी तथा उपसंचालक नगररचना यांनी तयार केलेली मूळ प्रारूप विकास योजना, नकाशे व अहवाल कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी १८ मे २०२६ रोजी महापालिकेकडे हस्तांतरित केले होते. मात्र, ती योजना प्रथम जनतेसमोर प्रसिद्ध न करता ३० जुलैच्या महासभेत ठराव क्र. २३ द्वारे आरक्षणे वगळणे, त्यांचे प्रयोजन बदलणे, नवीन आरक्षणे समाविष्ट करणे, रस्ते वगळणे तसेच रस्त्यांची रुंदी, संरेखन आणि काही जमिनींचा प्रस्तावित वापर बदलण्याचे निर्णय घेण्यात आले.

हे बदल नकाशे व अहवालात समाविष्ट करून नगररचना अधिकाऱ्याने ७ सप्टेंबर २०२६ रोजी ते प्रसिद्धीसाठी सादर केले. त्याच दिवशी आयुक्तांनी जाहीर सूचना काढली आणि १० ते १६ सप्टेंबर २०२६ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात कलम २६(१) अंतर्गत सूचना प्रसिद्ध झाली. त्यामुळे मूळ आराखडा जनतेसमोर न ठेवता महासभेने बदललेलाच आराखडा प्रथम प्रसिद्ध केल्याचे स्पष्ट होत असल्याचा दावा शेख यांनी केला.



**वीरराजे मित्र मंडळाने माळीवाड्याचा राजा गणेशाची स्थापना केली आहे. (छाया - राजू खरपुडे)**

## पान १ वरुन

### जिल्ह्यात पावसाची २३ टक्के तूट, दुष्काळ जाहीर होणार का?

सलग ३० दिवसांहून अधिक काळ पावसाचा खंड पडला आहे. पिके वाचवण्यासाठी आता मुळा आणि भंडारदरा धरणातून खरीप आवर्तने सोडण्याची मागणी शेतकरी करत आहेत. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने केवळ बैठकांचे सोपस्कार न पार पाडता, टंचाईग्रस्त गावांना तातडीने चारा छावण्या उपलब्ध करून देण्याची मागणी केली जात आहे. जिल्ह्यात दुष्काळ सदृश परिस्थिती जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी मदत कधी जाहीर करणार? याकडे शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

### मनोज जरांगे यांनी अखेर उपोषण सोडले!

आंदोलन करण्यास परवानगी नाकारल्याने जरांगे यांनी काही मोजक्या सहकाऱ्यांसह मुंबईकडे जाण्याचा निर्णय घेतला. मंगळवारी सकाळी ते मुंबईकडे रवाना झाले. त्यांचा पहिला मुक्काम पाटोद्यात होता. यावेळी हजारो मराठा बांधव उपस्थित होते. पाटोद्याहून जरांगे अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड, श्रीगोंदामार्गे पुण्याकडे व तेथून मुंबईकडे जाणार होते. मात्र पाटोद्यात मुक्कामास असताना जरांगे यांची प्रकृती खालावली. त्यांची बीपी आणि शुगर लेव्हल खूपच कमी झाल्याने त्यांची वैद्यकीय तपासणी करणाऱ्या डॉक्टरांनी त्यांना तातडीने रुग्णालयात अतिदक्षता विभागात दाखल होण्याचा सल्ला दिला. त्यास जरांगे यांनी नकार दिला. मात्र सहकाऱ्यांच्या आग्रहामुळे त्यांनी सलाईन घेतले. त्यानंतरही त्यांनी थेट मुंबईकडे जाण्याचा निर्धार केल्याने सरकार पातळीवर वेगवान हालचाली झाल्या. ऐन गणेशोत्सवात जरांगे यांनी मुंबईला येऊ नये, असे आवाहन सरकारने त्यांना केले. जरांगे यांच्या १२ मागण्या सरकारने मान्य केल्याचे सांगत चर्चेची दारे खुली ठेवली आणि उपोषण स्थगित करण्याचे आवाहन केले. आज गुरुवारी दुपारी जरांगे मुंबईकडे रवाना होणार होते. मात्र राज्याचे जलसंपदा तथा नगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शिक्षणमंत्री दादा भुसे आणि आ. प्रसाद लाड यांच्या शिष्टमंडळाने आज पहाटेच्या सुमारास पाटोदा येथे जरांगे यांची भेट घेत त्यांच्या मागण्यांवर जवळपास दीड तास चर्चा केली. ही चर्चा समाधानकारक झाल्याने जरांगे यांनी उपोषण मागे घेतले. त्याबाबतची घोषणा पत्रकार परिषदेत करताना मराठा समाजाच्या मागण्यांसाठी सरकारला ९० दिवसांचा अल्टिमेटम दिला. आपण उपोषण थांबविले आहे मात्र मागण्यांसाठी आंदोलन चालूच राहील असे त्यांनी म्हटल्याचे सांगण्यात आले. मागण्यांच्या पूर्ततेसाठी आपण सरकारला ३ महिन्यांचा वेळ दिला असून या कालावधीत सरकार काय निर्णय घेते हे पाहून पुढील निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले म्हटले आहे. हैदराबाद गॅझेटीयरच्या बाबतीत सरकारला अतिरिक्त वेळ दिला जाणार नाही. सातारा आणि कोल्हापूर गॅझेट तसेच इतर मागण्यांसाठी सरकारने वेळ मागितला आहे. मात्र ९० दिवसांच्या कालवधीत मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर मराठा समाजाचे आंदोलन अधिक तीव्र होऊ शकते, असा इशाराही जरांगे यांनी दिला आहे.

### अजित पवार राष्ट्रवादीत सुनेत्रा पवार यांचे रिलाँचिंग?

सुनेत्रा पवार यांची प्रतिमा जनमानसात पोहोचविण्यासाठी तसेच पक्षसंघटना बांधणीसाठी प्रयत्न केले जातील. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राजभरातील दौऱ्याचे नियोजन केले जाईल. त्यामुळे पक्षात सध्या निर्माण झालेली मरगळ झटकून पक्षाला नव्याने उभारी दिली जाईल यासाठी रणनीती आखण्यात असल्याची माहिती आहे.

### खंडणीसह जबरी चोरीच्या गुन्हयातील आरोपी...

हा गुन्हा दाखल झाल्यापासुन पसार झाला होता. आरोपी सातारा, सांगली, पुणे, छत्रपती संभाजीनगर येथे असल्याच्या मिळालेल्या गोपनीय माहितीवरून पथकाने नमूद जिल्हयात जाऊन आरोपीचा शोध घेतला. आरोपी प्रतिक गोकुळ पाचपुते, रा.काष्टी, ता.श्रीगोंदा हा शिंगवे तुकाई, ता.नेवासा परिसरात येणार असल्याची माहिती प्राप्त झाली.पथकाने मिळालेल्या माहितीवरून नमूद ठिकाणी सापळा रचुन ताब्यात घेतले.

## तायक्कांदो स्पोर्टस् असो.तर्फे केडगावात ब्लॅक बेल्ट परीक्षा




**समाचार/नगर-दि.१७**

इंडिया तायक्कांदो मान्यतेने व महाराष्ट्र तायक्कांदो असोसिएशनच्या अंतर्गत तायक्कांदो स्पोर्ट्‌स असोसिएशन व एकलव्य तायक्कांदो अकॅडमी अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आर एम टी बिझनेस सेंटर झेंडा चौक भूषण नगर केडगाव या ठिकाणी इंडिया तायक्कांदो व कुकिऑन ब्लॅक बेल्ट परीक्षा १३ सप्टेंबर रोजी संपन्न झाल्या. या परीक्षेत एक्झामिनर म्हणून राष्ट्रीय पंच क्युरोगी/पूमसे तेजकांत बोनगाडे यांचा मार्गदर्शनात ब्लॅकबेल्ट परीक्षा घेण्यात आले.

ब्लॅक बेल्ट परीक्षार्थी हर्षदा लोळगे, धनश्री जपकर, तनवी आवारी, आरती बांगर, सक्षम येणारे, समर्थ टकले, हर्षल कोतकर, हर्षदा हजारे, राहुल पोपळघट, ज्ञानेश्वरी दळवी, श्रद्धा गायकवाड, अमित लोंढे, पियुष सहानी, चंद्रकांत बिरारे, ओंकार पवार, नैतिक मगर, प्रांजल जगताप आदि परिक्षार्थींनी सहभाग नोंदवला या सर्व परीक्षार्थी खेळाडूंचे तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओबासे, उपाध्यक्ष घनश्याम सानप, महासचिव गफ्फार पठाण, कोषाध्यक्ष प्रसाद कुलकर्णी यांनी खेळाडूला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच आर.एम टी. बिझनेस सेंटरचे चेअरमन मनीष ठुबे यांनी खेळाडूचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ज्येष्ठ मार्गदर्शक अल्ताफ खान, तायक्कांदो स्पोर्ट्‌स असोसिएशन व एकलव्य तायक्कांदो अकॅडमीचे सचिव गणेश वंजारे प्रशिक्षक सचिन कोतकर, योगेश बिचितकर, मंगेश आहेर, सचिन मरकड यांनी अभिनंदन केले.

## मोहनलाल कुकरेजा यांचे स्विमींगमध्ये यश

**समाचार/श्रीरामपूर-दि.१७**

अहिल्यानगर जिल्ह्यातील जलतरणपटू मोहनलाल आरतमल कुकरेजा यांनी बहादुरगड (नागपूर) येथे नुकतेच झालेल्या २२ व्या राष्ट्रीय मास्टर्स स्विमींग स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करत २०० मीटर बेस्ट स्ट्रोक प्रकारामध्ये तिसरे स्थान पटकावित कांस्यपदक पटकाविले आहे.

मोहनलाल कुकरेजा यांची ऍसिएन मास्टर स्विमींग चॅम्पियनशिप बंगलोर येथे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धा ऑक्टोबर २०२६ मध्ये होणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पात्र ठरलेले एकमेव जलतरणपटू आहेत.

कुकरेजा यांनी कठोर परीश्रम व सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर कांस्यपदक पटकावले आहे. त्यांच्या कामगिरीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील जलतरणपटूंना एक वेगळी प्रेरणा मिळाली आहे. या पुढील स्पर्धांत त्यांचे नेतृत्वाखाली जलतरण स्पर्धेत सहभागी होण्याचा मनोदय जलतरणपटूंनी व्यक्त केला. स्थानिक कीडा क्षेत्रात त्यांचे यशामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र अभिनंदन होत आहे.

बंगलोर येथे होणाऱ्या जलतरण स्पर्धेसाठी कुकरेजा यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे




जलतरणपटू रामेश्वर शेळके, चांगदेव मोरे, अशोकराव थोरे तसेच जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आप्पासाहेब कदम, व्यापारी नंदलाल उर्फ राजेंद्र प्रसाद खटोड, राजु यादव, जेष्ठ पत्रकार सतिष ओहोळ, रमेश कोठारी, गुड मॉर्निंग क्लबचे अध्यक्ष डॉ. गजानन भालेराव, सर्व सदस्यांनी, अभिनंदन केले असून पुढील स्पर्धेत यश प्राप्तीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## विधीवत पूजन; बोरा परिवाराकडून अलंकार सुपूर्द

# श्री विशाल गणेशाला सुवर्ण रत्नजडीत तिलक अर्पण

**समाचार/नगर-दि.१७**

नगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणेशाच्या भव्य मूर्तीला सुवर्ण, माणिक अन् हिऱ्यांनी साकारलेल्या अलंकारांनी सजविण्यात आले. नगरच्या सिमरतमल कुंदनमल ज्वेलर्सचे संचालक बोरा परिवाराच्या वतीने सुमारे २४ लाख रुपये किमतीचे सुवर्ण रत्नजडित तिलक अलंकार गणेशोत्सव व संवत्सरीच्या शुभमुहूर्तावर श्री विशाल गणेश मंदिरात विधिवत पूजा व महाआरती करून बुधवारी अर्पण केले. यामध्ये श्री विशाल गणेशासाठी सुवर्णात घडविलेले व खास जपानहून आयात केलेल्या पांढऱ्या पवळ्यांचे त्रीपुंड्र तिलक, माणिक रत्नांचे त्रिनेत्र तिलक तसेच माणिक व हिऱ्यांनी साकारलेले त्रिशूल तिलक या अलंकारणाचा समावेश आहे.

श्री विशाल गणेशाचे मुख्य पुजारी महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते हे अलंकार गणेशाच्या माथी विराजमान करण्यात आले. यावेळी बोरा परिवार तर्फे तालयोगी ढोल पथकाची ढोल ताशांच्या गजरात विशाल गणपतीस मानवंदना देण्यात आली. यावेळी गणपती बाप्पाच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला.





सिमरतमल कुंदनमल ज्वेलर्सचे बाबूशेठ बोरा, अजित बोरा, ईश्वर बोरा, विनीत बोरा, गौतम बोरा यांच्यासह बोरा परिवारातील सदस्य व महिलांनी हे सुवर्ण रत्नजडित अलंकार महंत संगमनाथ महाराज व मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष अभय आगरकर यांच्याकडे सुपूर्द केले. तत्पूर्वी सर्व सदस्यांनी श्री विशाल गणेशाची विधिपूर्वक पूजा व महाआरती केली.

ईश्वर बोरा म्हणाले, सिमरतमल कुंदनमल ज्वेलर्स व बोरा परिवाराच्या वतीने ग्रामदैवत श्री विशाल गणेशास अलंकार अर्पण करण्याची इच्छा ही विनीत बोरा यांच्या संकल्पनेतून आली व ती आज पूर्ण होत श्री विशाल गणेशास हे सुवर्ण रत्नजडित अलंकार तयार करून अर्पण केले आहेत. यामध्ये पांढऱ्या पवळ्यांचे त्रीपुंड्र तिलक हे सव्वाशे गरम सोन्यात घडवलेले असून त्यासाठी खास जपानहून आयात केलेले पांढरे पवळे बसवण्यात आले आहेत. बाबूशेठ बोरा, अजित बोरा यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास समर्पण चातुर्मासच्या लाभार्थी राखी बोरा, हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमातीललाल कोठारी, डॉ.विजय भंडारी, मधुसूदन सारडा, मोहन मानधन, राजेश भंडारी,संतोष गांधी, डॉ.पारस कोठारी, विजय गुंदेचा, राजेश भंडारी मर्चंट बँकेचे संचालक किशोर गांधी, अनिल पोखरणा व मीना मुनोत, ॲड. ए.के. गुगळे, महावीर कांकरिया, संजय बोगावत, महेश गुंदेचा, चिंटू खंडेलवाल, हितेश गुप्ता, महेंद्र सहदेव, संजय बोगावत, वरुण चोपडा, पवन झंवर, चिराग शाह, अक्षय बकलीवाल तसेच बोरा परिवाराचे मिनल बोरा, हर्ष बोरा, निर्मला बोरा, शोभा बोरा, छाया बोरा, कविता बोरा, योगिता मुथा, विक्रम मुथा, जैनम बोरा, गगन बोरा, स्वाती गुंदेचा आदींसह मित्रपरिवार, विविध क्षेत्रातील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दत्तात्रय झरेकर यांचे निधन

**समाचार/नगर-दि.१७**



अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त शिक्षणविस्तार अधिकारी दत्तात्रय सबाजी झरेकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने शिक्षण क्षेत्रातील एक कर्तव्यनिष्ठ, अभ्यासू व मनमिळावू व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

झरेकर यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात शिक्षण विभागाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शैक्षणिक विकासासाठी विशेषकरुन नगर व पारनेर तालुक्यात उल्लेखनीय योगदान दिले. शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षण क्षेत्राशी निगडित विविध घटकांशी त्यांनी जिव्हाळ्याचे संबंध जपत आपली प्रशासकीय जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे व संवेदनशीलतेने पार पाडली. त्यांच्या कार्यपद्धतीत शिस्त, पारदर्शकता आणि माणुसकीचा सुंदर समन्वय होता.

हिंद सेवा मंडळाच्या पेमराज सारडा महाविद्यालयातील प्रा. अविनाश झरेकर यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## मुंबई शेअर भाव

**फेडच्या व्याजदरात मोठी वाढ**

**अमेरिकेचा डाऊजोन्स इंडेक्स ६३१ अंकांनी कोसळला**

अशोक पटवा हजार
(शेअर सबब्रोकर)
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९६१

**दिनांक १७-९-२०२६**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७४३८० |
| एसीसी | १२२८-२९ |
| एशियन पेंट | २४३९-४० |
| बजाज ऑटो लि. | ११४५९-६० |
| बलराम फूड चिनी | ६७७-७८ |
| भारत फोर्ज | १९२२-२३ |
| क्रॉम्प्टन | २२५-२६ |
| डीएलएफ | ६३९-४० |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ११७१-७२ |
| ग्रॅफाईट इंडिया | ८११-१२ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | १९५१-५२ |
| आयटीसी लि. | २६५-६६ |
| एल ॲण्ड टी लि. | ३८५४-५५ |
| रिलायन्स इंड. | १२४१-४२ |
| एसबीआय | ९८६-८७ |
| टाटा मोटर्स | ३०५-०६ |
| टाटा स्टील | १८४-८५ |
| टीसीएस | २१९१-९२ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | १७९-८० |
| कोव्हान्स फार्मा | ४३७-३८ |

# हिंदी पंधरवड्यानिमित्त कवी संमेलन उत्साहात

**समाचार/नगर-दि.१७**

हिंदी पंधरवड्यानिमित्त रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटी (डिस्ट्रिक्ट ३१३२), आधार आपुलकी फाउंडेशन, अमर कविता सोशल फाउंडेशन आणि कवींच्या हक्काचे व्यासपीठ असलेल्या गुलदस्ता' साहित्य मंच यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी हिंदी शिकविणाऱ्या प्राध्यापकांचा हिंदी दिनानिमित्त सन्मान करण्यात आला.



शहरातील स्थानिक कवी, शायर तसेच साहित्याची आवड असणाऱ्या कलाकारांना आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने गुलदस्ता' कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील विविध कवींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या दर्जेदार कविता, शायरी व साहित्यिक रचना सादर केल्या. काव्य, शायरी आणि सामाजिक विषयांवरील संवेदनशील मांडणीमुळे कार्यक्रमाला रंगत आली. उपस्थित साहित्यप्रेमींनी काव्यमय वातावरणाचा मनमुराद आनंद घेतला.

युनूस तांबटकर रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीचे अध्यक्ष डॉ.सईद शेख यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीचे सदस्य, पदाधिकारी, शहरातील साहित्यप्रेमी, कवी, कलाकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओमेगा नंदा यांनी केले, तर आभार निखिल कुलकर्णी व सचिव उदयभानसिंग परदेशी यांनी मानले.



प्रसिद्ध रांगोळी आर्टिस्ट दिनेश मंजरतकर यांनी रांगोळीने तयार केलेली श्री गणेशाची रांगोळी



**गुरूवाणी५३**

## ‘बंध’ तत्वाचे रहस्य..

समर्पण चातुर्मास

समर्पण-सर्व कल्याण

नऊ तत्वात 'बंध' तत्व असते. जसा बंध होईल तसे आयुष्य मिळेल. असा बंध झाला पाहिजे की परत त्यातून नवीन बंध निर्माण झाला नाही पाहिजे. असे करणारे मोक्ष गतीकडे वाटचाल करतात. आश्रव, संवर मन वचन कायेद्वारे होतो. बंध 'कषाय'मुळे होतो. क्रोध, अहंकार, माया, लोभ यामुळे बंध होतो. तुमच्याकडे नौकषाय नसतील तर कषाय होणारच नाही. कषायमधील स्त्री वेद, पुरूष वेद आणि नपुंसक वेद नसतील तर कषाय होणार नाही. दुर्दैवाने आज सगळीकडे या तीन वेदाचाच खेळ चालू आहे. मर्दानगी, सुंदरता याचे आकर्षण निर्माण केले जाते. पुरूषांच्या बनियनच्या जाहिरातीत महिलेचे काय काम असते? पण जाहिरातींचे विश्व नौकषायवरच चालते. कारण हे बंद झाले तर कोणतेच उत्पादन मार्केट मध्ये चालणार नाही. जाहिरातीतून तुम्हाला आकर्षित केले जाते. रति, अरति हे सुद्धा नौकषायमध्ये येतात. लाईक, डिसलाईक, हे माझे आवडते, ते माझे नावडते. तुम्ही हे दोन्ही सोडून दिले तर अहंकारही मनाला शिवणार नाही, भांडण होणार नाही आणि क्रोधही येणार नाही. तुम्हाला कोणी लाईक केलं तर आनंद होतो. कोणी डिसलाईक केले तर राग येतो. म्हणूनच सगळ्या तपात ब्रम्हचर्य तपाला श्रेष्ठ म्हणतात. ब्रम्हचर्य म्हणजे आसक्ती मुक्ती. एखाद्या

कवी, नाचणाऱ्याला, गायकाला तुम्ही प्रतिसाद दिला नाही तर ते स्वतःच बदलतात. नौकषाय हे कषायचे मूळ आहे. आजपर्यंत तुम्ही कषायवर काम करू शकला नाही कारण तुम्ही नौकषायवर काम केले नाही. नौकषायच कषायचा मास्टर माईंड आहे. लाईक, डिसलाईक नाही केले तर यावर काम होऊ शकते. जे आहे ते स्विकारा. टेस्टचे गुलाम बनू नका, टेस्टचे मालक बना. कर्माने तुम्हाला बांधलय की तुम्ही कर्माला बांधलय? याचे उत्तर शोधा. खरं तर दोन्हीही सत्य आहे. तुम्ही कर्माचाही क्षय करू शकता आणि आत्माही जागृत करू शकता. आत्मा जागृत केला तरी कर्म क्षय नक्की होतो. दोन्ही पैकी एक गोष्ट केली तरी मोक्षप्राप्ती होते. देव गुरू धर्माला लाईक करा, सत्ता, संपत्ती, संसाराला डिसलाईक करा. मी फक्त माझ्या गुरूला, परमात्म्याला, धर्माला लाईक करतो.

**उपाध्याय प्रवर**
**पू.श्री.प्रवीणऋषिजी म.सा.**



झारेकर गल्ली येथील मृत्यूंजय मित्र मंडळ(हनुमान व्यायाम शाळा)यांची भव्य अकरा फुटी श्री गणेश मूर्ती व महाभारत ग्रंथ शहराचे आकर्षण ठरले आहे. (छाया - अमोल भांबरकर)

## जय्यत तयारी सुरु; विविध समित्यांची निर्मिती

# नगरमध्ये २९ पासून शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळा

**समाचार/नगर-दि.१७**

येथील श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टच्या वतीने ऐतिहासिक शहरात प्रथमच श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्स मध्ये मंगळवारी दिनांक २९ सप्टेंबर ला दुपारी ३ वाजता या सोहळ्याचा शुभारंभ राजेशाही थाटात केला जाईल.

अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे महासचिव प.पू.श्री स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून हा कथा सोहळा साकारेल. सोहळ्याच्या उत्तम नियोजनासाठी विविध समित्यांची निर्मिती करण्यात



आली असून जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष श्री नंदलाल मनियार यांनी दिली.

ते म्हणाले दि. २९ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ दरम्यान दुपारी ३ ते सायंकाळी ७ या वेळेत कथा सोहळा चालेल. शनिवारी दि. ३ ऑक्टोबरला सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत कथा होऊन सांगता केली जाईल. मंगळवारी दि. २९ सप्टेंबरला पहिल्या दिवशी शिवजन्म पूर्व काळ, तत्कालीन परिस्थिती, शिवजन्म ते स्वराज्याची शपथ, संतकार्य. दि. ३० सप्टेंबरला दुसऱ्या दिवशी कान्होजी जेधे, जावळीचा वेढा, प्रतापगड युद्धनिती, अफझलखान वध, गुरुवारी दिनांक १ ऑक्टोबरला तिसऱ्या दिवशी पावनखिंडीतील शौर्य, चाकणचा रणसंग्राम, लाल महालावर स्वारी (शाहिस्तेखानावर मात), प्रथम आरमार स्वारी, पुरंदरचा वेढा व तह. शुक्रवारी दि. २ ऑक्टोबरला चौथ्या दिवशी आग्रा येथून सुटका, छत्रसाल बुंदेला यांना प्रेरणा, सिंहगड अर्थात तानाजी मालुसरे शौर्यगाथा. शनिवारी दि. ३ ऑक्टोबरला पाचव्या दिवशी महाराजांचे विजय पर्व, शिवराज्याभिषेक, स्वराज्याची स्थापना, भारतव्यापी हिंदवी साम्राज्य अशा पद्धतीने कथा निरुपण होईल.

या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष नंदनवन उद्योग समुहाचे संजय जाधव हे आहेत. मंचचे प्रायोजक शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन असून दि. ३ ऑक्टोबरला होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळ्याचे यजमानपद सुमित संतोष वर्मा हे भूषविणार आहेत. वैदिक पद्धतीने होणारा शिवराज्याभिषेक सोहळा या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरेल.

**समाचार**
**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# गणेशोत्सव सात दिवसांचा असावा

**साप्ताहिक संवाद**

**सध्या संपूर्ण महाराष्ट्रात गणेशोत्सवाची धूम आहे. या उत्सवाला अक्षरशः उधाण आलेले आहे. दरवर्षी गणेशोत्सव साजरा होताच असतो. परंतु,अलीकडच्या काही वर्षांमध्ये याच गणेशोत्सवाचं मोठ्या प्रमाणात साजरीकरण आणि तद्रुषंगाने बाजारीकरण होताना दिसतेय. गणपतीच्या उंचीची स्पर्धा असो,गणपती आगमन आणि विसर्जनाच्या दिवशी कर्णकर्कश आवाजात वाजवले जाणारे डीजे किंवा कर्णे आणि ढोल ताशे असोत,किंवा गणपती मंडळाच्या मंडपाचे प्रयोजकीकरण असो आणि सर्वात महत्वाचं म्हणजे गणपतीच्या मूर्ती शाडूच्या की मातीच्या?या सर्व प्रश्नांवरून महाराष्ट्राच्या या महाउत्सवाचं विद्रुपीकरण होताना दिसतेय. म्हणूनच गणेशोत्सवाचे बदलत्ते स्वरूप या विषयाच्या अनुषंगाने पर्यावरण अभ्यासक नारायण जोगळेकर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

---

**आपल्याकडच्या पारंपरिक गणेशोत्सवाचं स्वरूप नेमकं कस होतं?**



सार्वजनिक गणेशोत्सवाचा प्रारंभ हा खर तर लोकमान्य टिळकांनी केलेला आहे. घरातला गणपती सार्वजनिक मंडपामध्ये आणण्यामागे टिळकांचा उद्देश हा स्पष्ट होता की, तत्कालीन जुलमी ब्रिटीश राजवटी विरुद्ध तमाम भारतीयांना एकजूट करून एकजूटीनेच ब्रिटिशांची सत्ता उलथविणे. अर्थात तेंव्हा याची गरज होती. ब्रिटिश गेल्यानंतर आपल्याच देशात कालांतराने तरुणांमधील व्यसनाधीनता, बेरोजगारी, अंधश्रद्धा अशा प्रश्नासंदर्भात जनजागृती करीता गणेशोत्सव मंडळांची भूमिका आणि कार्य हे स्पृहणीय होते. आणि तेंव्हाच्या या गणेशोत्सवाला खऱ्या अर्थाने पारंपरिक स्वरूप होत. संबळ, सनई चौघडे अशी पारंपरिक वाद्य, कमीत कमी उंचीच्या आणि मुख्य म्हणजे मातीच्या मूर्ती, असा नेटका थाट होता. आणि तेव्हा गणेशोत्सवाच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानांचे, कार्यक्रमांचे आयोजन असायचे जे आता कुठेच दिसत नाही.

**बदलत्या काळानुसार सद्यस्थितीतील गणेशोत्सवाचे स्वरूप हे योग्य आहे का?**

सध्या म्हणजे अलीकडच्या काही दशकांचा विचार करता आता या सार्वजनिक गणेशोत्सवाला अक्षरशः साजरीकरण आणि बाजारीकरण होताना दिसतेय. गणपतीच्या मोठ्या मूर्तींची मंडळांमध्ये स्पर्धा लागलेली दिसतेय. याचाच परिणाम म्हणजे यंदा मुंबईत दोन मुर्ती कोसळून जीवितहानी झाली. प्लास्टर ऑफ पॅरिस च्या मूर्तींमुळे विसर्जनानंतर पर्यावरणाच्या प्रदूषणाचा गंभीर प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला आहे. त्याच वेळी मोठ्या आवाजातील कर्णे, डीजे आणि ढोलताशांमुळे ध्वनी प्रदूषणाची मर्यादा देखील जीवघेणी होतेय. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या नावाखाली बीभत्स नृत्य आणि गाणी आपली परंपरा बनताना दिसतेय. हे सगळं चित्र अतिशय शोकजनक आहे.

**गणेशोत्सवाचं मर्यादित स्वरूप कसं असावं असं तुम्हाला वाटतं?**

मुळातच ज्या उदात्त हेतूने टिळकांनी गणेशोत्वाला सार्वजनिक रूप दिल तो काळ आता संपलेला आहे. आता गणेशोत्सव म्हणजे परंपरा कमी आणि बाजारीकरण जास्त बनलेला आहे . त्यामुळेच आता बदलत्या काळानुसार सरकारनेच या उत्सवाला मर्यादांचे कुंपण घालून द्यायला हवे. मुळात,गणेशोत्सव हा ११ दिवसांचा न करता केवळ सात दिवसांचा करावा ज्यामुळे सार्वजनिक वाहतुकीवर आणि रस्त्यांवर देखील ताण येणार नाही. गणपतीच्या अवाढव्य मूर्तींना बंदी घालून केवळ ५ फुटांच्या मूर्तींनाच परवानगी द्यावी. शिवाय या मूर्ती शाडूच्या मातीच्याच असाव्यात हे बंधन असावे. आणि अर्थातच मोठाले कर्णे,डीजे,आणि रोमबा सोम्बा या ऐवजी आपल्या पारंपरिक वाद्यांनाच अशा सणोत्सवात वाजविण्याची सक्ती करावी.वातावरणातील प्रदूषण कमीत कमी करण्यासाठी आणि उत्सवाचे मंगलमय स्वरूप टिकण्यासाठी असा गणेशोत्सव काळाची गरज आहे.

**लोकरंग**

संकलन-संयोजन
**सुशीलकुमार**
susheelkumar80@yahoo.com

# भारतात एमिझाचा भिवंडीत विस्तार, ७०० हून अधिक नवीन रोजगाराची अपेक्षा




भारतातील अग्रगण्य थर्ड-पार्टी लॉजिस्टिक (3PL) सेवा पुरवठादारांपैकी एक असलेल्या 'एमिझा'ने ७५,००० चौरस फूट आणि १,५७,००० चौरस फुटांच्या दोन नवीन फुलफिलमेंट सुविधा सुरू करून आपल्या मुंबईतील कामकाजाचा विस्तार जाहीर केला. भिवंडी येथे स्थित या सुविधा मुंबई परिसरातील एमिझाची ५ वी आणि ६ वी वेअरहाऊसेस (गोदामे) ठरतील, ज्यामुळे कंपनीच्या फुलफिलमेंट नेटवर्कमध्ये एकूण २.३२ लाख चौरस फुटांची क्षमता जोडली जाईल. एमिझाच्या या ताज्या विस्तारामुळे पश्चिम भारतातील पुरवठा साखळीचा (सप्लाय चेन) हा पाया अधिक भक्कम होणार आहे. वाढता ऑनलाईन खप, उत्पादनांची विस्तृत श्रेणी तसेच वेग आणि उपलब्धतेबाबत ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षांमुळे भारतातील डिजिटल कॉमर्स इकोसिस्टम वेगाने विस्तारत आहे, आणि याच पार्श्वभूमीवर हा विस्तार करण्यात आला आहे. यामुळेच, वितरित व्यापाराला (डिस्ट्रिब्युटेड कॉमर्स) सक्षम पाठबळ देण्यासाठी मजबूत अपस्ट्रीम फुलफिलमेंट पायाभूत सुविधा अत्यंत आवश्यक ठरतात. क्विक कॉमर्स जलद वितरणासाठी परिसरातील डार्क स्टोअर्सवर अवलंबून असले, तरी मोठी प्रादेशिक फुलफिलमेंट सेंटर्स इन्व्हेंटरी साठवणे, ऑर्डर्सवर प्रक्रिया करणे आणि डाऊनस्ट्रीम नेटवर्क्समध्ये मालाचा पुरवठा करण्याचे काम करतात. एमिझाच्या या दोन नवीन सुविधा हीच क्षमता वाढवतील, ज्यामुळे ब्रँड्सना उत्पादनांची उपलब्धता सुधारण्यास, मोठ्या प्रमाणातील व्हॉल्यूम कार्यक्षमतेने व्यवस्थापित करण्यास आणि मागणी वाढेल त्यानुसार विस्तार करण्यास मदत होईल. मल्टी-क्लायंट सुविधा असल्याने, ब्रँड्सना स्वतःच्या स्वतंत्र पायाभूत सुविधांमध्ये वारंवार गुंतवणूक न करता वेअरहाऊसिंग

**नोंद**

क्षमता वाढवणे शक्य होईल, ज्यामुळे विस्तारादरम्यान भांडवली कार्यक्षमता वाढेल.या विस्ताराबाबत बोलताना अजय राव, संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), एमिझा, म्हणाले, ब्रँड्सचा विस्तार होण्यासाठी त्यांच्या पाठीशी असलेली लॉजिस्टिक पायाभूत सुविधा मागणीच्या आधीच विस्तारली पाहिजे. मुंबईतील आमची गुंतवणूक हीच आवश्यक क्षमता निर्माण करण्यासाठी आहे. या सुविधांमुळे आमच्या ग्राहकांना अधिक प्रमाणात साठा ठेवता येईल, मोठ्या व्हॉल्यूमचे व्यवस्थापन करता येईल आणि लॉजिस्टिकचा अडथळा न होता व्यवसाय वाढवता येईल.''

# ग्रेट इंडियन बस्टर्ड अभयारण्य



**चला पर्यटनाला**

ग्रेट इंडियन बस्टर्ड अभयारण्य हे महाराष्ट्र, भारतातील सोलापूर जिल्ह्यात स्थित एक संरक्षित क्षेत्र आहे. ८,६०० हेक्टर क्षेत्र व्यापलेले, अभयारण्य गंभीरपणे धोक्यात असलेल्या ग्रेट इंडियन बस्टर्डचे संरक्षण करण्यासाठी १९७९ मध्ये स्थापित केले गेले.सोलापूर हे अभयारण्याच्या सर्वात जवळचे शहर आहे आणि अभ्यागतांसाठी प्रवेशद्वार म्हणून काम करते. अभयारण्य सोलापूरपासून सुमारे ११५ किमी अंतरावर असून रस्त्याने जाता येते. अभयारण्यात जाण्यासाठी अभ्यागत टॅक्सी भाड्याने घेऊ शकतात किंवा बसने जाऊ शकतात.

सोलापूरमधील ग्रेट इंडियन बस्टर्ड अभयारण्य हे एक अद्वितीय परिसंस्था आहे जे विविध वनस्पती आणि प्राणी यांचे घर आहे. ग्रेट इंडियन बस्टर्ड व्यतिरिक्त, अभयारण्य पक्षी, सस्तन प्राणी आणि सरपटणारे प्राणी यांच्या इतर अनेक प्रजातींचे घर आहे. अभयारण्यात येणारे पर्यटक पक्षीनिरीक्षण, निसर्ग चालणे आणि वन्यजीव छायाचित्रणाचा आनंद घेऊ शकतात. अभयारण्याला भेट देण्याचा सर्वोत्तम काळ म्हणजे हिवाळ्याच्या महिन्यात जेव्हा हवामान आल्हाददायक असते आणि पक्षी जास्त सक्रिय असतात.एकूणच, सोलापूरमधील ग्रेट इंडियन बस्टर्ड अभयारण्य हे भारतातील संवर्धन आणि जैवविविधतेसाठी एक अनोखे आणि महत्त्वाचे ठिकाण आहे.

## शब्दखेळ - ६२५

**खाली दिलेल्या चौकोनात गणेशाने वध केलेया एका राक्षसाचे नाव लपलेले आहे शोधा पाहू.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | मि | यु | य | ला | बा | श्व | शि |
| ठ | जो | शि | जी | डू | ज्ञ | ग | चं |
| णा | सा | क | ह | ले | भा | व | न |
| ना | य | सु | ह | ट | सु | ना | ले |
| लि | ज | ग | म | र | म्रा | म | र |
| म | शे | मे | र | डी | मो | सा | क |
| दा | ड | थी | त | ह | कां | ळी | तः |
| स | स | ल | द | रे | मे | नी | ग |

**शब्दखेळ - ६२४ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नी | सु | री | र | व | मां | पुं | या |
| चे | रा | गा | मा | ली | क्ष्म | ला | आ |
| र | क | अ | शो | ने | ला | ब | ड |
| धु | शो | रा | म | चा | द | कु | न |
| ना | ली | तू | ई | ला | री | त | ट |
| ता | ला | दे | ण | भा | ब | जा | र |
| ब | म | व | क | ए | सा | र | बॉ |
| स | ती | म्र | नी | मे | के | म | र्ण |

**उत्तर - धुम्रवर्ण**

## समान काम, समान वेतनाची मागणी; बेमुदत संपाचा इशारा

# न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्याफिती आंदोलन

**समाचार/नगर-दि.१७**

समान काम, समान वेतनाच्या मागणीसह न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा वेतनवाढीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे दीर्घकाळ प्रलंबित असल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने आंदोलनाचा पहिला टप्पा सुरू करण्यात आला. या आंदोलनांतर्गत अहिल्यानगर जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती लावून दिवसभर कामकाज केले. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वेतनश्रेणीप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही समान वेतन देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन वेतनवाढीच्या प्रस्तावाला मंजुरी द्यावी. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने दिला आहे.



यावेळी अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव आनंद सोनपसारे, उपाध्यक्ष रवींद्र सूर्यपुजारी यांच्यासह न्यायालयीन कर्मचारी काळ्याफिती लावून आंदोलनात सहभागी झाले होते. राज्यातील दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांचा वेतनवाढीचा प्रस्ताव शासनाकडे २०२५ पासून प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली आहे. या संदर्भात मुंबई येथे १६ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत चारही महासंघांनी एकत्रितपणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती लावून कामकाज केले. वेतनवाढीच्या प्रस्तावाला शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन मंजुरी द्यावी, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन न्यायालयीन कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. शासनाकडून मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येणार आहे.

१६ व १७ ऑक्टोबर : काळ्याफिती लावून कामकाज, ५ नोव्हेंबर : सामूहिक रजा आंदोलन, १७ नोव्हेंबरपासून : मागण्यांची दखल न घेतल्यास बेमुदत संप. वेतनवाढीचा प्रस्ताव तातडीने निकाली काढावा आणि प्रलंबित मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी केली आहे.



# एसा संस्थेतर्फे अभियंता दिन उत्साहात

**समाचार/नगर-दि.१७**

गुणवत्तापूर्ण काम, शिस्त आणि कठोर परिश्रम या भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी सांगितलेल्या मार्गावर चालणे आवश्यक आहे अभियंत्यांनी तंत्रज्ञानाचा स्वीकार करून दर्जेदार व पर्यावरण पूरक प्रकल्प उभे करावे. प्रामाणिकपणे आणि सचोटीने काम केल्यास यश निश्चित मिळते, असा संदेश स्ट्रडकॉम कन्सल्टंटचे संचालक व प्रतिथयश आरसीसी डिझायनर इंजि. जयंत इनामदार यांनी दिला.

अहिल्यानगर इंजिनिअर्स असोसिएशनच्या (एसा) वतीने अभियंता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून इंजि. जयंत इनामदार उपस्थित होते. यावेळी अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, शहर अभियंता मनोज पारखे, उपशहर अभियंता श्रीकांत निंबाळकर, सहायक संचालक पुनम पंडित, टाऊन प्लॅनर बालाजी केकाण, स्वाती अहिरे, शरद बर्डे, गणेश कोकाटे, रविराज पेखले आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक एस.आर.जे. स्टीलचे रीजनल हेड प्रकाश सोनावणे, एरिया सेल्स हेड अविनाश पुरोहित, विशाल येसेकर, टोस्टेम विंडोचे शुभम बनसोडे, शनीराज टाइल्सचे शिवाजी शिंदे, व्यंकटेश इंफ्राचे ओम आठरे तसेच अंबिका स्टोन क्रशर, श्री आनंद ट्रेडिंग कंपनी, श्री आनंद सेल्स, पटेल सिरॅमिक, वैष्णवी टाईल्स, डायकीन एसी, श्रीराम मार्बल, अर्टिको लिफ्ट, पंकज स्टील, ढोणे ट्रेडर्स, अभय सेल्स कॉर्पोरेशन, शुभारंभ टाइल्स, संकल्प इंटरप्रायजेस, डायमंड टाईल्स यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. इंजि. जयंत इनामदार, संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे यांनी मनोगत व्यक्त केले.

## एमआयडीसीतील पॉलीमिक्ट ग्रुपचा पर्यावरणपूरक उपक्रम

# गणेशोत्सवाने दिला 'आपली पृथ्वी वाचवूया'चा संदेश

**समाचार/नगर-दि.१७**

'आपली पृथ्वी वाचवूया' या संकल्पनेसह शाश्वत उत्पादनाचा महत्त्वपूर्ण संदेश देत अहिल्यानगर एमआयडीसीमधील पॉलीमिक्ट ग्रूप पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करत आहे. हा उपक्रम शहरात चर्चेचा विषय ठरला आहे. कंपनी कॅम्पसमध्ये गणेशोत्सवानिमित्त साकारण्यात आलेला आकर्षक देखावा, केवळ सजावट नसून उद्योग क्षेत्राने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा आणि शाश्वत उत्पादनाचाचा विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्याचा संदेश देणारा आहे. उत्पादन प्रक्रियेत पर्यावरणाचा विचार, संसाधनांचा योग्य वापर, ऊर्जा बचत आणि शाश्वत विकास यांचे महत्त्व या देखाव्यातून अधोरेखित करण्यात आले आहे.



विशेष म्हणजे हा विचार केवळ गणेशोत्सवापुरता मर्यादित न ठेवता पॉलीमिक्ट ग्रूपकडून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यावर भर दिला जातो. त्यामुळे या देखाव्यातून दिलेला संदेश हा केवळ विचार नसून कंपनीच्या कार्यपद्धतीशी जोडलेला आहे. प्रत्येक कंपनीने शाश्वत उत्पादनाचा विचार करून आपल्या उत्पादन प्रक्रियेत पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब केला तर भविष्यातील पिढ्यांसाठी पृथ्वीचे संरक्षण करणे शक्य होईल. पुढील ५० वर्षांसाठी पृथ्वी टिकवायची असेल, तर आजपासूनच उद्योगांनी शाश्वत उत्पादनाचा मार्ग स्वीकारणे गरजेचे आहे, हा अत्यंत महत्त्वपूर्ण संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे. हा सुंदर आणि विचारप्रवर्तक देखावा साकारण्यासाठी पॉलीमिक्टच्या टीमने आपले कौशल्य, सर्जनशीलता आणि टीमवर्क पणाला लावले. या उपक्रमात मनीष अकोलकर, हर्ष राजगुरू, अथर्व पिंगे, धनश्री बारस्कर, आर्या हराळे, सम्राट मुरकुटे, संभाजी नवले, चांगदेव साठे, वीणा तट्टू, ऋषिकेश जाधव, तेजल खोडदे, संतोष भिताळे, रोशन भूवड, अण्णा अडागळे, अजय निमोणकर, किशोर कसबे, गणेश शिंदे, रवींद्र नन्नावरे, कल्याणी पंडुरे, अलवत कुमार, प्रवीण माने, भरत डोंगरे, आरती अनारसे, सुरभी देशमुख-खिस्ती, त्रिवेणी करांडे, रोहित मुळे, रावसाहेब पाटील यांनी योगदान दिले.

या उपक्रमासाठी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रामचंद्र सुखटणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी चिन्मय सुखटणकर तसेच सिनियर मॅनेजमेंट टीममधील रवींद्र महाजन, शंतनू खानवेलकर, संजय राणे, वसंत पाटील, विशाल भट, प्रवीण कुलकर्णी, सारंग शुक्रे, प्रदीप गायकवाड, संजय पर्वत, जोशी, राजू केनी यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले.



**नगर शहरातील सांगळे गल्ली येथील न्यूव बीईसीटीपी चे संचालक देविदास दुसाऱ्यांच्या कन्या मनश्री व धनश्री यांनी शाडू मातीची गणपती मूर्ती हाताने बनवली. तसेच पुठ्ठा, कागदी कप, व कापूस या पासून शिव - शक्ती पुत्र गणेश हा देखावा तयार केला आहे.**

# दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सतर्फे अभियंता दिन साजरा




**समाचार/नगर-दि.१७**

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या १६६ व्या जयंतीनिमित्त दि इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर स्थानिक केंद्राच्या वतीने दि. अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने टिकाऊ आणि तंत्रज्ञानिक स्वावलंबी भारतासाठी अभियांत्रिकी उत्कृष्टता या मध्यवर्ती संकल्पनेवर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास भाग्यलक्ष्मी मिल (पोलाद स्टील), जालना येथील रिसर्च अँड डेव्हलपमेंट हेड व संचालक द्विज काबरा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. गुणवत्ता आश्वासन नियंत्रक (वाहने) (सीक्यूएव्ही), अहिल्यानगरचे नियंत्रक ब्रिगेडियर राजीव चावला यांनी मध्यवर्ती संकल्पनेवर प्रमुख व्याख्यान दिले.साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेचे अध्यक्ष व अडसूळ टेक्निकल कॅम्पसचे संचालक डॉ. अनिरुद्ध अडसूळ अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्थेचे माजी अध्यक्ष मनोहर अणेकर, मानद सचिव डॉ. दीपक विधाते तसेच आयईआय अहिल्यानगर स्थानिक केंद्राचे अध्यक्ष भारतभूषण भागवत व्यासपीठावर उपस्थित होते. अध्यक्षस्थान भारतभूषण भागवत यांनी भूषविले.

ब्रिगेडियर राजीव चावला डॉ. अनिरुध्द अडसूळ, दविज काबरा यांनी मनोगत व्यक्त केले. म्हणाले की, सरकारच्या औद्योगिक धोरणामुळे देश सेमीकंडक्टर, संरक्षण साहित्य, इलेक्ट्रिक वाहने, हवाई क्षेत्र आदी विविध क्षेत्रांत वेगाने प्रगती करीत आहे. संरक्षण क्षेत्राचे बजेट उत्तरोत्तर वाढत असून राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने देश स्वावलंबी होत आहे. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी अभियंत्यांनी नवीन संकल्पनांवर संशोधन करावे. संशोधन, नाविन्यता आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून देशाच्या प्रगतीला गती मिळू शकते, असे आवाहन ब्रिगेडियर राजीव चावला यांनी केले.

अभियंता दिनाचे औचित्य साधून संस्थेच्या वतीने विविध अभियंता पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. याशिवाय जिल्ह्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २० हून अधिक नामवंत अभियंत्यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्कार, अभियांत्रिकी उपलब्धी पुरस्कार, महिला अभियंता पुरस्कार, उदयोन्मुख अभियंता पुरस्कार तसेच चत्रभुज बजाज उद्योजक पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# सारडा महाविद्यालयात 'रासेयो' शिबीर

**समाचार/नगर-दि.१७**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे आणि पेमराज सारडा महाविद्यालय,अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'प्रजासत्ताक पूर्व संचलन व राष्ट्रीय प्रजसत्ताक पूर्व संचलन निवड शिबिर' या एक दिवसीय जिल्हास्तरीय शिबिर महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाले. उद्घाटन सत्रात प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी शिबिरार्थी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.महात्मा गांधींचा 'खेड्याकडे चला' हा संदेश अवलंबण्यासाठी आपल्या कार्याची सुरुवात खेड्यामधूनच झाली पाहीजे.असे नमूद केले.




प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी होणे ही प्रत्येक छड्ड स्वयंसेवकासाठी अत्यंत प्रतिष्ठेची आणि अभिमानाची संधी आहे.कर्तव्यपथावर देशाच्या प्रथम नागरिकांना मानवंदना देण्याचा क्षण हा केवळ एका स्वयंसेवकाचा सन्मान नसतो;त्या क्षणी त्याच्या कुटुंबाचा, महाविद्यालयाचा,विद्यापीठाचा आणि संपूर्ण छड्ड परिवाराचा सन्मान होत असतो.असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जिल्हा समन्वयक प्रा. गणेश निमसे उपस्थित होते.त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व व प्रजासत्ताक पूर्व संचलन व राष्ट्रीय प्रजासत्ताक पूर्व संचलन निवड चाचणी संदर्भात स्वयंसेवकांना नियमावली व विस्तृतपणे मार्गदर्शन केले.या शिबिरास प्रा.डॉ.प्रकाश गावित,कॅप्टन रविंद्र चोभे, प्रा.धनंजय लाटे,प्रा.डॉ.किरणकुमार साळवे व डॉ. श्याम शिंदे हे परीक्षक लाभले.या शिबिरासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून विविध महाविद्यालयातील एकूण ४० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला. निवड चाचणीसाठी स्वयंसेवकांनी पंधराशे मीटर धावणे, परेड घेणे, मुलाखत, इ. विविध परीक्षांमध्ये आपले कौशल्य पणाला लावले.परीक्षकांनी तटस्थपणे व निपक्षपातीपणे नियामानुसार ८ विद्यार्थिनी व ८ विद्यार्थी असे १६ स्वयंसेवकांची निवड करून विद्यापीठ्स्तरावर निवडीस पाठवले.

## आठवड्यातील योजनांची माहिती देणार

# जिल्हा माहिती कार्यालयाचा माध्यम संवाद नाविन्यपूर्ण उपक्रम

**समाचार/नगर-दि.१७**

जिल्ह्यातील विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, उपक्रम आणि नागरिकांसाठीच्या विविध सेवांची माहिती प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने 'माध्यम संवाद' हा नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत दर गुरुवारी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात येणार असून, प्रत्येक आठवड्यात एका विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची व उपक्रमांची माहिती माध्यम प्रतिनिधींना देण्यात येणार आहे. या उपक्रमाची सुरुवात गुरुवार दि. १७ सप्टेंबर रोजी दुपारी ४.३० वाजता राजस्व सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे होणाऱ्या माध्यम संवादातून करण्यात येणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधणार आहेत. शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती नागरिकांना वेळेवर मिळणे, तसेच त्याचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे यासाठी माध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे. 'माध्यम संवाद' उपक्रमाच्या माध्यमातून संबंधित विभागांच्या कामकाजाची, योजनांची तसेच नागरिकाभिमुख उपक्रमांची माहिती माध्यम प्रतिनिधींना थेट उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे विभागांकडून करण्यात येणारे काम व्यापक स्वरूपात नागरिकांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.नगर परिषदांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती या पत्रकार परिषदेत जिल्ह्यातील नगर परिषद/ नगर पंचायतींनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया माध्यम प्रतिनिधींना देणार आहेत. नगर परिषदांच्या माध्यमातून नागरिकांसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, स्थानिक पातळीवरील नव्या संकल्पना आणि त्यातून नागरिकांना उपलब्ध होणाऱ्या सुविधांची माहिती यावेळी देण्यात येणार आहे. अधिकाधिक माध्यम प्रतिनिधींनी या पत्रकार परिषदेला उपस्थित राहण्याचे आवाहन असल्याचे जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत यांनी केले आहे.

## डोंगरे, प्रा. गायकर, पुरोहित यांचा भक्तिमय प्रवास

# विविध घाटमार्गांचा सामना करीत नगर-अष्टविनायक सायकलवारी पूर्ण

**समाचार/नगर-दि.१७**

गणपती बाप्पाच्या भक्तीने प्रेरित होऊन अहिल्यानगर येथील सायकलप्रेमी शरद डोंगरे, प्रा. बाळासाहेब गायकर आणि सत्यनारायण पुरोहित यांनी अहिल्यानगर ते अष्टविनायक अशी तब्बल ७०७ किलोमीटरची सायकल वारी पूर्ण केली. पाच दिवसांच्या या प्रवासात विविध घाटमार्गांचा सामना करीत तिघांनी अष्टविनायक गणपतींचे दर्शन घेतले. या प्रवासात सुमारे ५२८६ मीटरचे एलिव्हेशन पार करण्यात आले. या सायकल वारीमध्ये तिघांनी मोरगाव येथील मयुरेश्वर, सिद्धटेक येथील सिद्धिविनायक, थेऊर येथील चिंतामणी, लोणावळा व खोपोली मार्गे पाली येथील बल्लाळेश्वर, महड येथील वरदविनायक, माळशेज घाट व गणेशखिंड मार्गे लेण्याद्री येथील गिरिजात्मक, ओझर येथील विघ्नहर्ता आणि रांजणगाव येथील महागणपतीचे दर्शन घेतले.



प्रवासादरम्यान घाटरस्ते, चढ-उतार आणि पावसाचा सामना करीत तिघांनी सायकल वारी पूर्ण केली. प्रत्येक पेडलसोबत गणपती बाप्पाचे नामस्मरण करीत हा प्रवास करण्यात आला. त्यामुळे ही वारी केवळ सायकलचा प्रवास न राहता श्रद्धा, भक्ती, जिद्द, संयम आणि आत्मविश्वासाची अनुभूती देणारी ठरली. प्रवासादरम्यान विविध ठिकाणी मित्रपरिवार तसेच सायकलप्रेमींची भेट झाली. अनेकांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा देत पुढील प्रवासासाठी स्फूर्ती दिली. या सर्वांच्या सदिच्छांमुळे वारीचा उत्साह अधिक वाढल्याचे तिघांनी सांगितले.

याबाबत शरद डोंगरे यांनी सांगितले की, हा प्रवास जिद्दीचा होता. गणपती बाप्पाला भेटायचे होते आणि त्याचबरोबर निसर्गरम्य वातावरण एक्सप्लोर करायचे होते. भक्ती, शक्ती आणि निसर्ग जोपासण्याचा संदेश देत सायकलचे महत्त्व सांगत हा प्रवास पूर्णत्वाकडे नेला. सायकल ही केवळ प्रवासाचे साधन नसून आरोग्य, निसर्ग आणि आनंदाशी जोडणारे माध्यम आहे. त्यामुळे 'देखना है तो कल, तो रोज चलाओ सायकल' असा संदेश देत त्यांनी सायकलप्रेमाचा जागर केला.



## ग्रामदैवत विशाल गणपती

माळीवाड्यातील विशाल गणपती पूर्वाभिमुख असून, ११ फूट उंच सिद्धीविनायकाची ही स्वयंभूमी मूर्ती आहे. या गणपतीचे मंदिर नाथपंथीय आहे. या गणपतीची आरती वाद्यांच्या गजरात मोठ्या थाटामाटात केली जाते.



## वाळके वाड्यातील गणपती

टांगेगल्ली येथील वाळके वाड्यातील हा गणपती नगरच्या अष्टविनायकांपैकी एकमेव डाव्या सोंडेचा आहे. साडेपाच फूट उंचीचा हा गणपती भाविकांचे श्रद्धास्थान आहे. वाळके कुटुंबाने मूर्ती अलंकाराने मढविल्याने मोहक दिसते. वाळके कुटुंब दरवर्षी एकत्र येऊन मंदिरात गणेशोत्सव साजरा करतात.



## मुळे वाड्यातील गणपती

दिल्ली दरवाजाजवळील देशमुख गल्लीतील मुळे वाडयात ही स्वयंभू गणेशमूर्ती आहे. उजव्या सोंडेचा हा गणपती नवसाला पावणारा आहे, अशी शहरातील भाविकांची श्रध्दा आहे.

**पाहिजेत**
होलसेल किराणा दुकानात कामासाठी
**माणूस/मुलगा पाहिजे**
**हेल्पर : २**
– संपर्क –
8888843131

**शॉप विकणे किंवा भाड्याने देणे आहे**
प्रगती कॉम्प्लेक्स, चितळे रोड येथील १०० चौरस फूट शॉप भाड्याने देणे किंवा विकणे आहे.
*तसेच झोपडी कँटीन, उषा देवी टॉवर मधील प्रत्येकी ५०० चौरस फूट चे दोन ऑफिसेस एकत्रित किंवा स्वतंत्र भाड्याने किंवा विकत देणे आहे.
– संपर्क –
9421620457

**ड्रायव्हर पाहिजेत**
घरगुती कार गाडीसाठी ७ ते ९ वर्षांचा चांगला अनुभव, तसेच १० ते १२वी शिक्षण असणारा निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे.
ड्रायव्हिंग लायसन्ससह समक्ष भेटा
– संपर्क –
9325115016

**पाहिजेत**
नामांकित डायग्नोस्टिक सेंटरसाठी **टायपिस्ट**
(लेडिजला प्राधान्य)
**त्वरित पाहिजेत**
(डायग्नोस्टिक सेंटरमध्ये कामाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य)
– संपर्क –
फोन : 0241-2411010
9653969292

हिंद सेवा मंडळाचे
**पेमराज सारडा महाविद्यालय**
अहिल्यानगर

**टेंडर नोटीस**

पेमराज सारडा महाविद्यालयातील वरिष्ठ महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागात गॅस पाईपलाईन करावयाची असून, अधिकृत वितरकांनी सदर कामाबाबत वरिष्ठ महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागात सकाळी ११ ते ०४ या वेळेत दिनांक १८ सप्टेंबर २०२६ ते २१ सप्टेंबर २०२६ या कालावधीत समक्ष पाहणी करून दिनांक २१ सप्टेंबर २०२६ पर्यंत बंद लिफाफ्यात निविदा लेखा विभागात जमा कराव्या.

हिंद सेवा मंडळ आणि पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर यांना कोणत्याही निविदेचा स्वीकार किंवा अस्वीकार करण्याचा अधिकार राखीव आहे.

**प्राचार्य,**
**पेमराज सारडा महाविद्यालय,**
**अहिल्यानगर**



## मिरीकर वाड्यातील गणपती

जुन्या कोर्टासमोरील सरदार मिरीकर वाड्यातील गणपती पुरातन आहे. उजव्या सोंडेचा हा गणपती वाड्यातील एका कोपऱ्यात आहे. मिरीकर कुटुंबीय या गणपतीची पूजा करतात.



## खाकीदासबाबा मठातील गणपती

खाकीदासबाबा मठातील गणपतीची मूर्ती तीनशे वर्षांपूर्वीची आहे. उजव्या सोंडेचा हा गणपती चारही हातांनी आर्शीवाद देणारा आहे. कोणत्याही हातात शस्त्र नसणारी ही मूर्ती आहे. ट्रस्टच्यावतीने यांची देखभाल केली जाते.



## वाडेकर वाड्यातील गणपती

अर्बन बँक रस्त्यावरील जुन्या वाडेकर वाड्यात उजव्या सोंडेची ही मूर्ती अडीचशे वर्षांपूर्वीची आहे. संगमरवरी मूर्तीचे जानवे नागाचे आहे. नित्यदर्शनाने मनोकामना पूर्ण होते, अशी भाविकांची श्रध्दा आहे.

**भाड्याने/ विकणे आहे**
केडगाव अंबिकानगर बस स्टॉपसमोर, स्टेट बँकेच्या मागील नवीन 2BHK फ्लॅट अर्जंट विकणे आहे.
दरमहा भाडे रू.८०००/- फक्त
- संपर्क -
9404321356

**घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा**
**वृद्धत्व-कॅन्सर-अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना घरच्यासारखी निवासी सेवा - शुश्रूषा. (सशुल्क)**
**स्नेहदीप केंद्र**
केडगाव, अहमदनगर
9011020176
9011026483
7499980845
(सहयोग - स्नेहालय)



## गुजर गल्लीतील अक्षता गणपती

येथील गुजर गल्लीतील अक्षता गणपती. हा नगरमधील अष्टविनायक गणपतींपैकी आहे. विवेकांनद चौक ते कोर्ट रस्त्यावर गणपतीचे मंदिर आहे. पूर्वीच्या काळात सदर जागेवर विहीर होती. विहिरीत देवपूजा झाल्यानंतर सदरचे पाणी विहिरीत टाकले जात असे. विहिरीतील तांदळापासून अक्षता गणपती तयार झाला आहे. सदर मूर्ती उंची ५ फूट असून, मांडी घातलेली आहे. उजव्या सोंडेचा हा गणपती आहे. कोणत्याही शुभकार्याचे निमंत्रण प्रथम या गणपतीस देण्यात येते.

*** संकलन व सर्व छायाचित्रे ***
**उदय जोशी, मो. नं. ९४२३१६३९०३**



## शमी गणपती

दिल्ली दरवाजाजवळील शमी गणपती मंदिरात दर्शनासाठी भाविकांची नेहमी गर्दी असते. शमीच्या झाडाखालील मुळीपासून ही मूर्ती तयार झाल्याची आख्यायिका आहे. नवसाला पावणारा म्हणून शमी गणपतीची ख्याती आहे.

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी

m डागा
**शांतीलाल डागा**
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
– फोन नं –
७५८८११५१५७,
९८२२०८१४४०

अॅडव्हान्स बुकिंग सुरू
MY CINEMA
AHILYANAGAR'S 1ST
5-SCREEN MULTIPLEX
Pipeline Road, Ahilyanagar. Onling Booking - BookMyShow



- Show -
18/9/2026
to
21/9/2026

DAAYRA (Hindi) - 9:00, 11:20 am, 3:45, 7:45, 10:45 pm, HANUMAN ANSH - 8:45 am, 11:30, 1:10, 5:30, 8:10 pm, RESIDENT EVIL (Hindi) - 8:30 am, 12:45, 4:50, 9:00 pm, VIBE (Hindi) - 10:15 am, 2:20, 6:30, 10:45 pm, MIRZAPUR : THE MOVIE - 9:45 am, 2:10 am, 4:15, 8:30, 10:15 pm, MANJAR (Marathi) - 2:00, 6:15 pm.
Booking No. : 9325085347 | टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात.

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दि.१८/०९/२०२६ ते दि.२४/०९/२०२६



| | |
|---|---|
| HANUMAN ANSH (हिंदी) | |
| 10.30 AM | 12.50 PM |
| 04.00 PM | 05.30 PM |
| 10.05 PM | |
| DAAYRA (हिंदी) | |
| 09.45 AM | 12.30 PM |
| 06.15 PM | 09.15 PM |
| MIRZAPUR : THE MOVIE (हिंदी) | |
| 01.30 PM | 05.30 PM |
| 09.30 PM | |
| VIBE (हिंदी) | |
| 10.15 AM | 01.00 PM |
| 06.45 PM | 09.30 PM |
| MANJAR (मराठी) | |
| 03.30 PM | |
| RESIDENT EVIL (हिंदी) | |
| 09.00 AM | 11.00 AM |
| 03.40 PM | 08.15 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
AVAILABLE ON book show CONNPLEX AVAILABLE ON book show
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

# अंबिका महिला सहकारी बँकेस 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार'




**समाचार/नगर-दि.१७**

दि अंबिका महिला सहकारी बँकेस बँकिंग क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक फेडरेशन लि., मुंबई यांचा महाराष्ट्र राज्यातील महिला बँक गटातून सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार २०२६ छत्रपती संभाजीनगर येथील फेडरेशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष प्रविण दरेकर यांच्या शुभहस्ते आणि फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, उपाध्यक्षा वैशाली आवाडे, फेडरेशनचे संचालक ॲड. अशोक शेळके, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला.

सदर पुरस्कार बँकेच्या अध्यक्षा शांता भिमराज मोरे, उपाध्यक्षा सुमन गणेश गोसावी, संस्थापिका प्रा. मेधाताई काळे व संचालिका मंडळ यांनी स्विकारला. याप्रसंगी विविध बँकांचे ३०० हून अधिक बँक प्रतिनिधी उपस्थित होते, अशी माहिती बँकेच्या अध्यक्षा शांता मोरे यांनी दिली.

पुरस्काराला उत्तर देताना बँकेची संस्थापिका प्रा. मेधाताई काळे म्हणाल्या की, बँकेचा एकूण व्यवसाय रू. २३५ कोटीहून अधिक आहे. सी आर ए आर. २१.०१%, नक्त एन. पी. ए. ०.०%, नियमित लेखापरिक्षण वर्ग अ, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे Eligibility Criteria for Business uthorisation सर्व निकष पूर्ण करत आहे. सभासदांना मागील अनेक वर्ष १३ % लाभांश देणारी जिल्ह्यातील एकमेव महिला बँक आहे. बँकेने ग्राहकांसाठी मोबाईल बँकींग, फोन पे, गुगल पे, यु.पी. आय., ए.टी.एम. व अन्य डिजिटल सेवा सुरू केलेली आहे. ठेवी वरील व्याजदर ३६६ दिवसांसाठी ८% करण्यात आला असून कर्जावरील व्याजदर संतुलित केलेले आहे. बँकेस सर्वोत्कृष्ठ बँक पुरस्कार २०२६ प्राप्त झाल्याने आमचा आनंद द्विगुणित झालेला आहे.

बँकेच्या नावलौकिक व प्रगतीमध्ये उपाध्यक्षा मुख्याध्यापिका सुमन गोसावी, संस्थापक संचालिका, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटच्या अध्यक्षा प्रा. डॉ. संध्या जाधव, आशा मिस्किन, ॲड. शारदा लगड, भारती आठरे, सरोजिनी चव्हाण, शोभना चव्हाण, शोभा खरपुडे, ॲड. विजया काकडे तज्ञ संचालक सी. ए. ज्ञानेश्वर काळे, सेवक संचालक सुभाष म्हस्के, निलेश जगताप, मुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश गायकवाड, कर्मचारी वृंद यांचे प्रामाणिक व निष्ठेचे समर्पण आहे. याप्रसंगी बँकेच्या नुतन संचालिका शिल्पा वाघ, प्रा. वैशाली मरकड उपस्थित होत्या.




**आदित्य एंटरप्राईजेस**
गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर. मोबाईल नं. : ९३२५१०३७८१